वर्ष १३

अंक ७ वा

१५ जानेवारी १९४०

# समाजस्वास्थ्य



संपादक -

र. धों. कर्वे,

एम्. ए.

किंमत

४

आणे

# कामोत्तेजक औषध

हें केवळ कामोत्तेजक नसून शक्तिवर्धकही आहे. हें नियमाने पुष्कळ दिवस घेण्यास हरकत नाही. नपुंसकत्व व मंदकामत्वाच्या बहुतेक प्रकारांवर हें गुणकारी होईल. आठ दिवसांच्या औषधाची किंमत रु. ४, ट. ख. १४ आणे.

## राइट एजन्सी,

**नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.**

**गुप्तरोगप्रतिबंधाकरितां सर्वांत सोयीचें औषध**

# जेलोट्यूब

## फ्रेंच सरकारनें पसंत केलेलें

दोन वेळांचे पेटीस किंमत रु. १–३ आ.

तीन पेट्यांस रु. ३–४ आ.

**राइट एजन्सी, नं. १३ नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.**

# अनुक्रमणिका.


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | धर्माची पीछेहाट ... ... ... ... | १९३ |
| २. | सनातनी मन ... ... ... ... | १९८ |
| ३. | सुप्रजाजनन ... ... ... ... | २०६ |


# या अंकांतील चित्रें


१. हें चित्र व दर्शनी चित्र : ग्रीक सौंदर्यदेवता व्हीनस.

२. ज्युपिटर आपल्या कोंडून ठेवलेल्या प्रियतमेच्या मंदिरांत सोनेरी पावसाच्या रूपानें शिरतो व क्यूपिड ( मदन ) गंमत पाहतो.

३. सुप्तोत्थिता.

४. **पतिव्रता स्युझाना** ( बायबलांतील गोष्ट )

५. ग्रीक पुराणांतील अॅटालांटा हिच्या पणाप्रमाणे तिला युक्तीने शर्यतींत जिंकणाराशीं तिचें भांडण.

६. कुतूहल.

७. अॅरिआना ( ग्रीक पौराणिक स्त्री )

८. श्री. शकुंतला परांजपे यांची मुलगी ' सई '



अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हांस मिळाली पाहिजे.

**इतर ग्राहकांस पत्ताः—**राइट एजन्सी,

नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव मुंबई.

मागील अंकास तीन आणे, तीन अंकांस आठ आणे, नमुना फुकट अमुकच महिन्याचा अंक नमुन्याकरता मिळणार नाही.

# कामोत्तेजक औषध

दोन वेळांचे पेटीस किंमत रु. १–३ आ.

तीन पेटयांस रु. ३–४ आ.

**राइट एजन्सी, नं. १३ नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.**

# अनुक्रमणिका.


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | धर्माची पीछेहाट ... ... ... ... | १९३ |
| २. | सनातनी मन ... ... ... ... | १९८ |
| ३. | सुप्रजाजनन ... ... ... ... | २०६ |
| ४. | पाठच्या बहिणी ... ... ... ... | २१३ |
| ५. | तैलयुक्त फळें ... ... ... ... | २२१ |
| ६. | वैद्यकी व्यवसायांतील अनुभव ... ... ... | २२३ |
| ७. | प्रेतचौर्य ... ... ... ... ... | २२९ |
| ८. | स्तनांच्या वाढीकरतां उपचार ... ... ... | २३३ |
| ९. | स्पेनच्या युद्धांतील गोष्टी ... ... ... | २३४ |
| १०. | कुरूपता म्हणजे काय ?.... ... ... ... | २३७ |
| ११. | पेंचप्रसंग ... ... ... ... ... | २३९ |
| १२. | शारदेचें पत्र ... ... ... ... | २४८ |
| १३. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... ... | २५२ |
| १४. | विवाहसौख्याला काय लागतें ? ... ... ... | २५४ |


## वर्गणीची माहिती

हें मासिक दर महिन्याचे १५ तारखेस प्रसिद्ध होतें. कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येईल. वार्षिक वर्गणी ट. हा. सह दीड रुपया. हिंदुस्थानाबाहेरील ग्राहकांस रु. २ किंवा ३ शिलिंग. व्ही. पी. मागविल्यास चार आणे जास्त पडतील.

**पोर्तुगीज प्रांतांत व्ही. पी. पाठवणार नाहीं.**

वर्गणीबद्दल **पोस्टाचीं तिकिटें घेतली जाणार नाहींत.** पैसेच पाठवावें.

**पुणें येथील ग्राहकांनीं** प्रो. दि. धों. कर्वे, ६९–१ लॉ कॉलेज रोड, यांजकडे वर्गणी भरल्यास चालेल. किरकोळ अंकही तेथें मिळतील.

अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हांस मिळाली पाहिजे.

**इतर ग्राहकांस पत्ताः**—राइट एजन्सी,

नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव मुंबई.

मागील अंकास तीन आणे, तीन अंकांस आठ आणे, नमुना फुकट अमुकच महिन्याचा अंक नमुन्याकरता मिळणार नाही.

# पुणेंकरांची सोय

**श्री. शकुंतलाबाई परांजपे** ह्या स्त्रियांस स्वतः तपासून योग्य आकाराच्या रबरी टोपीची निवड करून ती वापरण्या-संबंधी संपूर्ण माहिती देतील. टोपीबरोबर वापरावी लागणारी जेली, व टोपीही त्यांजकडेच विकत मिळेल. गरजूंनीं त्यांजकडे चौकशी करावी. भेटण्याची वेळ, दुपारीं ३ ते ५.

पत्ताः—नं. १२२०,
रँगलर परांजपे रोड, भांबुर्डा; पुणें–४.

# राइट काँट्रसेप्टिव्ह जेली

☞ संततिनियमनाकरतां ☜

## ही जेली आतां सुवासिक केली आहे

ही जेली सर्वांत अलीकडच्या शास्त्रीय शोधांचे आधारें आम्हीं बनवली असून ती बिलकुल हानिकारक नसूनही रेतजंतुनाशाकरतां उत्कृष्ट आहे.

'सेक्सस् पेस्ट्' पेक्षां ही नळी किंचित् लहान आहे. सोबत कांचेची नळी नाही. कांचेचे नळीशिवाय वापरण्याची सोपी रीत सोबत दिली जाईल.

**नळीची किंमत २ रुपये, ट. ख. ९ आणे**

**राइट एजन्सी, १३ नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई ४.**

# मुंबई येथें मासिक विकणारांस

आमचे ऑफिसांतून प्रती मिळतील.

**राइट एजन्सी,** १३ नवी भटवाडी, गिरगांव मुंबई.

## पुणें येथील ग्राहकांची सोय

आमचीं सर्व पुस्तकें, ' डच् कॅप्, राइट अँटिसेप्टिक टॅब्लेट्स् ( वड्या ), व राइट कॉंट्रॅसेप्टिव्ह जेली इतका माल नं. ६९-१ लॉ कॉलेज रोड, येथें **प्रो. दि. धों. कर्वे,** पी एच्. डी. यांजकडे रोखीनें विकत मिळेल.

( भेटण्याची वेळ सकाळीं ७–३० ते ९–३० )

**राइट् एजन्सी,** नं. १३ नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.

---

आमचीं सर्व पुस्तकें व राइट वड्या श्री. वि. बा. आचवल, ५१२ नारायण पेठ, पुणें, येथेंहि विकत मिळतील.

**राइट् एजन्सी,** नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.


---


मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई. नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,**
नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.

# संततिनियमनाचीं साधनें.

डच कॅप, प्रत्येकीं ... रु. ३.

राइट वड्या, डझनाचे नळीस, ....,, १–३–०

राइट जेली,.... .... ....,, २–०–०

स्पंज .... .... ....,, १–३- ०

# प्रसाधनसाधनें.

भोवऱ्याची पिचकारी

( योनिमार्ग धुण्याकरतां ) ... ....,, ५–०–०

कपायचूर्ण ( पिचकारीनें धुण्याच्या


पाण्यांत घालण्याकरतां

सुवासिक, आकुंचक चूर्ण ) ...,, १–४–०

त्वचाशुद्धि (त्वचा साफ राहण्याकरतां),, १–०–०

## राइट एजन्सी,

१३ नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई–४.





अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# धर्माची पीछेहाट

—+×+—

सर्व धर्मांचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर तो असा दिसतो की आधुनिक शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीपुढे धर्मांची एकसारखी पीछेहाट होत चाललेली आहे. तथापि पारंपरिक समजुतींचा पगडा पुष्कळांवर इतका भक्कम असतो की त्यांना ही सहज दिसणारी गोष्ट कबूल करवत नाही आणि ते कांहीतरी वेड्यावांकड्या मार्गांनी शास्त्रीय ज्ञानाच्या प्रचंड शक्तीपासून धर्माचा बचाव करूं पहात असतात. शास्त्रीय ज्ञान सृष्टिनिरीक्षणाने मिळवलेलें असतें आणि धार्मिक लोक ज्याला ज्ञान समजतात तें केवळ डोळे मिटून केलेल्या चिंतनाने आणि मननाने डोक्यांतून काढलेलें असतें. कल्पिलेल्या गोष्टी खऱ्याच असल्या पाहिजेत असें नाही, यामुळे या डोक्यांतून काढलेल्या गोष्टी पुष्कळ वेळां खोट्या ठरतात. देव, आत्मे, भुतें वगैरे डोक्यांतून काढलेल्या गोष्टी आहेत आणि त्या काढणारे लोक कितीहि बुद्धिमान असले तरी केवळ कल्पिलेल्या गोष्टी अनुभविक सत्याच्या कसोटीला कशा उतराव्या ? आजमितीला या सर्व गोष्टी खोट्या ठरलेल्या आहेत. अर्थात् एक अदृश्य राक्षस आपल्याला मदत करीत आहे किंवा विरोध करीत आहे अशी कल्पना करण्यांतच एखाद्याला समाधान वाटत असलें तर तसें त्याने खुशाल मानावें, आणि कोणत्याहि युक्तिवादाने त्याची कल्पना खोटी ठरवतां येणार नाही. ईश्वराची आज हीच स्थिति झालेली आहे. ईश्वराचें अस्तित्व खोटें, असें कोणालाहि सिद्ध करतां येणार नाही. युक्तिवादाने इतकेंच सिद्ध करतां येतें की तो दिसत तर नाहीच, पण को[ण]त्याहि

रीतीने भासत देखील नाही, आणि त्याच्या अस्तित्वाचा जगावर कोणताहि परिणाम झालेला दिसत नाही. सर्व गोष्टी ईश्वर नसल्यासारख्याच चाललेल्या आहेत, तेव्हा ईश्वराच्या अस्तित्वाला श्रद्धेपलीकडे पुरावा नाही, आणि समंजस मनुष्य काल्पनिक गोष्टी पुराव्याशिवाय खऱ्या मानीत नाही.

अर्थात् याचा अर्थ असा नव्हे की कल्पनेने काढलेल्या कोणत्याच गोष्टी खऱ्या नसतात. कल्पना आणि कल्पकता यांचे साह्यानेच पुष्कळ वेळां शास्त्रीय ज्ञान मिळत असतें. परंतु कल्पना कितीहि बुद्धिमान माणसाने केली, तरी तेवढ्यावरूनच ती कल्पना खरी ठरत नाही. त्या कल्पनेला युक्तिवादाची कसोटी लावावी लागते, आजपर्यंतच्या ज्ञानाशीं ती कल्पना विसंगत नाही असें सिद्ध व्हावें लागतें, आणि मगच कोणतीहि नवीन कल्पना विचारांत घेतां येते. आणि पुष्कळ वेळां कांही नवीन ज्ञान मिळाल्याने जर ती कल्पना विसंगत दिसूं लागली, तर ती सोडून द्यावी लागते. निदान खऱ्या शास्त्रीय वृत्तीचा मनुष्य अशा कल्पनेला कधी चिकटून बसणार नाही.

पण धार्मिक लोकांची वृत्ति याच्या बरोबर उलट असते. कांही झालें तरी परंपरा सोडायची नाही, हा त्यांचा बाणा असतो. अलीकडे शास्त्रीय ज्ञानाचें महत्व वाढल्यामुळे ते आपली परंपरा शास्त्रीय ज्ञानाला धरून आहे असें दाखवण्याचा प्रयत्न करतील. उदाहरणार्थ रेशमी वस्त्र सोंवळें कसें, आणि तें जेवतांना कां नेसायचें, असें विचारल्यास ते म्हणतात की रेशमांत वीज असते. जणूं काय जेवतांना विजेची विशेष जरूर असते! हा सगळा खटाटोप फोल असतो, आणि असल्या निराधार परंपरा नेहमीं नाहीशा होत असतात. पण हें पुष्कळांना उमजत नाही, आणि त्यांचा प्रयत्न चालूच असतो.

थिऑसॉफिस्ट लोकांचा पंथ याच प्रकारचा आहे. कोणीकडून तरी धर्माची आणि शास्त्रीय ज्ञानाची सांगड घालून देण्याचा या लोकांचा अट्टाहास असतो. धर्म म्हणजे अमुकच, असा त्यांचा आग्रह नाही, किंवा सर्व धर्मांत सत्य आहे असें ते म्हणतात. अर्थात् त्यांतले मूळचे हिंदू असतात ते गीतेला अधिक

महत्व देतात, इतर लोक इतर धर्मग्रंथांना, किंवा धार्मिक कल्पनांना महत्व देतील. अमुक तत्वांवर विश्वास असला पाहिजे असा त्यांचा आग्रह नाही, पण धर्माचें गौडबंगाल मात्र त्यांना जरूर पाहिजे असें वाटतें. या परंपरेपैकीं प्रो. रा. स. भागवत एम्. ए. यांनी ' आजची तरुण पिढी व धर्माची आवश्यकता ' या विषयावर कोल्हापूर येथे दिलेल्या व्याख्यानाचा सारांश तेथील ' विद्यापीठपत्रिके ' ने दिला आहे व तो आमचेकडे एका वाचकाने पाठवला आहे.

ज्यांना स्वतःला आपल्या मतांचें युक्तिवादाने समर्थन करतां येत नाही, असे लोक इतरांवर भलभलतीं मतें लादून त्यांचें खंडण करण्यांतच समाधान मानतात. या व्याख्यात्यांनी सांगितलें की 'ज्या गोष्टी दिसत नाहीत, त्या नाहीत असें मानण्याकडे एक सर्वसाधारण कल दिसून येतो. पण हा कल चुकीचा आहे. गुरुत्वाकर्षण दिसत नसलें तरी तें खरें आहे. हवा व ईथर दिसत नसले तरी त्यांचें अस्तित्व शास्त्रांनी सिद्ध केलें आहे. ' जें दिसत नाही तें नाही, असें लहान मुलें कदाचित् म्हणतील, दुसरा कोणीहि म्हणणार नाही. हवेचें अस्तित्व शास्त्रांनी सिद्ध करावें लागत नाही, ती आपल्याला शरीराला समजते. असे भलभलते आरोप श्रोत्यांवर कां करावे ? शिवाय व्याख्यात्यांनी उदाहरणें दिलीं नसतीं, तर झांकली मूठ सवा लाखाची राहिली असती, पण उदाहरणें देण्यांत ते घसरले. हवेचें उदाहरण फोल आहे हें उघडच आहे, पण गुरुत्वाकर्षण आणि ईथर या दोहोंवरहि आधुनिक शास्त्रज्ञांनी हल्ला केलेला आहे, ही गोष्ट व्याख्यात्यांस माहीत नसावी असें दिसतें.

न्यूटनसारख्या थोर शास्त्रज्ञाची गुरुत्वाकर्षणाची कल्पना देखील उलथून पाडण्याला शास्त्रज्ञ मागेपुढे पहात नाहीत, हाच धार्मिक वृत्तींतील आणि शास्त्रीय वृत्तींतील फरक आहे. पुष्कळ लोकांना असें वाटतें की शास्त्रीय कल्पना जर अशा वारंवार बदलतात, आणि आज सत्य वाटणारी कल्पना उद्यां खोटी ठरण्याचा संभव असतो, तर मग शास्त्रीय ज्ञानांत सत्य तें काय राहिलें ? आज एक सत्य, उद्यां दुसरेंच सत्य ! धार्मिक ज्ञान शाश्वत असतें असें म्हणतात, मग तेंच श्रेष्ठ

नव्हे का ? याचें उत्तर असें आहे की निरीक्षण केलेल्या कांहीं गोष्टींची उपपत्ति न्युटनने एका प्रकारची दिली होती. ती न पटल्यामुळे किंवा तींत विसंगति दिसूं लागल्यामुळे दुसऱ्या शास्त्रज्ञाने दुसऱ्या प्रकारची उपपत्ति दिली, तर त्यांतली कोणती अधिक चांगली हें युक्तिवादानेच ठरवावें लागतें, आणि त्यांतली आज जी बरी वाटेल ती घ्यावी लागते. ही दुसरी उपपत्ति कदाचित् उद्यां खोटी ठरेल हेंहि खरें, परंतु त्यापासून कोणतेंहि नुकसान नाहीं. शास्त्रीय ज्ञानाचा जो उपयोग आज जगाला होतो आहे, तो तसाच होत राहाणार, किंबहुना अधिक बरोबर उपपत्ति सांपडली तर अधिक उपयोग होण्याचा संभव असतो. धार्मिक ज्ञान शाश्वत असतें हीहि एक कल्पनाच आहे. ज्या ज्ञानाला कल्पनेशिवाय कोणताहि पुरावा नाही, तें पाहिजे तर शाश्वत आहे असें म्हणावें, इतकेंच !

प्रो. भागवतांनी ' अदृश्य सृष्टींत धर्माने संशोधन करून प्रयोगानें सत्य वाटणाऱ्या गोष्टी जगापुढे मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे ' असें जें विधान केलें आहे, तें अत्यंत दिशाभूल करणारें आहे आणि त्यांत बिलकुल तथ्य नाही. उदाहरणार्थ ते पुढे म्हणतात, ' पण मानवी जीवाला मरणोत्तर अस्तित्व आहे हें अलीकडील प्रसिद्ध शास्त्रवेत्त्यांनी मान्य केलें असून सर ऑलिव्हर लॉज यांनी यासंबंधी एक ग्रंथहि प्रसिद्ध केला आहे. सर ऑलिव्हर लॉज यांनी असा एक ग्रंथ लिहिला आहे खरा, पण त्यांनी स्वतः देखील त्याला शास्त्रीय ग्रंथ म्हटलेलें नाही आणि मरणोत्तर अस्तित्व शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झालेलं आहे असेंहि त्यांनी कोठे म्हटलेलें नाही त्यांचा स्वतःचा तसा विश्वास होता, इतकेंच त्या ग्रंथावरून सिद्ध होतें. परंतु कितीहि मोठा शास्त्रज्ञ असला तरी त्याचा विश्वास म्हणजे शास्त्रीय सत्य नव्हे, हें प्रो. भागवतांना कळलें पाहिजे होतें. त्यांचीं इतर विधानेंहि याच दर्जाचीं आहेत. त्यांनी उल्लेखिलेलें सहावें इंद्रिय ही केवळ थाप आहे, मग ती कोणाच्याहि डोक्यांतून निघालेली असो. असल्या थापा देणाराला शास्त्रज्ञ मात्र केव्हाहि म्हणतां येणार नाही. या इंद्रियामार्फत दुसऱ्याच्या मनांतील विचार जाणतां येतात असें त्यांचें म्हणणें आहे. याचा कोणीहि सार्वजनिक

प्रयोग करून दाखवावा असें आमचें आव्हान आहे. सामान्यतः या प्रकारचा जो प्रयोग दाखवतात, तो केवळ प्रेक्षकांना चकवणारा एक जादूचा खेळ असतो. मृतात्मे वगैरेसंबंधीचे प्रयोग देखील याच प्रकारचे असतात, आणि अशा लोकांची अनेक वेळां कोर्टांत फटफजीति झालेली आहे. तरी देखील सर ऑलिव्हर लॉजसारखे भोळसट लोक सहज फसतात. या शास्त्रज्ञाचा मुलगा मेला व त्याच्या मनाला इतका चटका लागला की मुलाच्या आत्म्याची गांठ घालून देतों असें म्हणणारांवर त्याने विश्वास ठेवला. 'मला कोणी फसवील का हो?' अशीच इच्छा धरणाराला कोण फसवणार नाही? त्याच्या पुस्तकांत शास्त्रीय पद्धतीचें नांव नाही, आणि अशा प्रकारचा पुरावा त्याने स्वतः शास्त्रीय बाबतींत कधींहि कबूल केला नसता.

तरुण पिढीने या शास्त्रज्ञासारखे भोळसट न होतां नेहमी अशा गोष्टींबद्दल साशंक वृत्ति राखली पाहिजे, आणि विशेषतः शास्त्रीय ज्ञानाचे सोंग आणणाऱ्या गूढवादापासून सावध राहिलें पाहिजे. या बाबतींत प्रो. भागवतांसारख्यांचा उपदेश ऐकण्यांत धोका आहे. मृतात्म्यांच्या नादाने वेड लागल्याचींहि कांही उदाहरणें आहेत, आणि हे प्रयोग दाखवणारे लोक इतके बिलंदर असतात की मृतात्म्याने सांगितलेली (अर्थात् अशी थाप दिलेली) गोष्ट खोटी ठरली की 'मृतात्मे कधीकधी खोटें बोलतात' ही पळवाट नेहमी तयार असते. अशा लोकांवर विश्वास ठेवणें म्हणजे आपण होऊन संकटांत पडणें आहे. ज्योतिषी ग्रहांच्या नांवाने फसवतात, हे लोक मृतात्म्यांच्या नांवाने फसवतात, इतकाच फरक.

---

### जाहीर केलेलें बक्षिस या गोष्टीला दिलें आहे

# सनातनी मन

(लेखकः—**अनंत कृष्ण बापट**, बल्लारपूर.)

'कां शास्त्रीबुवा, आज इकडे कुणीकडे?'

स्वतः बसलेली खुर्ची पुढें करीत आणि स्वतःला बसण्याकरतां दुसऱ्या

एकुलत्या एक पण तुटक्या आरामखुर्चीचा पाय नीट करीत मी जरा आश्चर्यानेच उद्गारलों.

पुण्याला वेताळ पेठेंत उपटसुंभ्या मारुतीशेजारींच त्या वेळीं मी रहात असें. आमचे शेजारीं उपटसुंभ्या मारुतीच्या देवालयाचे मालक शास्त्रीबुवा खाऊन पिऊन सुखी गृहस्थ होते. सुखी म्हणजे फक्त सांपत्तिक दृष्ट्या. देऊळ चांगलें नांवाजलेलें, देवहि नवसाला पावणारा म्हणून ख्यात, शिवाय वार्षिक उत्सव वगैरे थाटाचा होत असल्यामुळे शास्त्रीबुवांस त्यापासून वर्षाकांठीं हजार दीडहजारांचें उत्पन्न असे. शिवाय राहण्यास देवळाला लागूनच प्रशस्त घर आणि छोटासा बगीचा.

पण जगांत सर्व तऱ्हेने सुखी असा मनुष्य फारसा आढळत नाही. शास्त्रीबुवांची द्वितीय पत्नी दोन वर्षें क्षयाचें दुखणें भोगून तीन वर्षांपूर्वी वारली होती. बुवांचें वयहि त्या वेळीं सुमारें पन्नाशीच्या जवळजवळ आलेलें, व ना मूल ना बाळ घरांत. नाही म्हणायला त्यांच्या द्वितीय पत्नीची एक बालविधवा मावसबहिण, तिचे आजारांत घरांत कुणीतरी करायला हवें म्हणून त्यावेळीं आली होती. तिने आपल्या बहिणीची फारच उत्तम सेवा केली आणि शास्त्रीबुवांचें खाणेंपिणें, पूजेची तयारी, वगैरे सर्व-ती करून देत असे. पण होणाऱ्या गोष्टीला इलाज नसतो. पाण्यासारखा पैसा ओतूनहि कांही यश आलें नाही. 'ईश्वरेच्छा' म्हणून बुवांनी कपाळाला हात लावला. पुढे शास्त्रीबुवांना दोन घांस करून घालायलाहि कोणी नव्हतें, तेव्हा ती बालविधवा बहिणहि अगदी निराधार असल्यामुळे तिने पुण्यासच रहावें असें बुवांनी सुचवलें व तीहि बिचारी कबूल झाली या गोष्टीला.

'माझं एक काम कराल का ?' पुढे केलेल्या खुर्चीमध्यें स्वतःला कसेंबसें बसवीत शास्त्रीबुवांनी प्रश्न केला. त्यामुळे तर माझें आश्चर्य दुणावलें. माझ्यासारख्या तीस रुपड्या मिळवणाऱ्या कारकूनाला त्यांचें असें कोणतें काम करता येण्यासारखें आहे याचा मी स्वतःशींच अंदाज करूं लागलों, पण कांही लक्षांत

येईना. तीनचार वर्षांपूर्वी शेजारधर्म म्हणून त्यांच्या पत्नीचे आजाराचे वेळीं मी त्यांना कधीकधी औषधपाणी आणून देत असें व शेवटी शेवटीं कांही दिवस मला बुवांचे बरोबर तिचेजवळ बसून जाग्रणें करावीं लागलीं होतीं एवढेंच. पण त्या वेळींहि शास्त्रीबुवा 'तुम्ही अलीकडचीं मुलें' म्हणून माझी कुचेष्टा करीत. त्यानंतर दोनचार वेळां मी त्यांचेकडे जेवायला गेलों होतों, पण पुढे रस्त्यांत गांठ पडल्यास नमस्कारचमत्कारापलीकडे आमचे कधी फारसें बोलणें झालें नव्हतें. शिवाय बुवांच्या त्रिकाल पुजा आणि इतर आन्हिकें यांत त्यांना तरी फारसा वेळ कुठें मिळत असे फालतू गप्पा मारायला ?

मी उत्तर दिलें नाही असें पाहून शास्त्रीबुवा म्हणाले, 'कराल का माझं एवढं काम ?' या पुन्हा केलेल्या प्रश्नाने मला विचारतंद्रींतून खडबडून जागें केलें व मी म्हणालों,'हो न करायला काय झालं ? माझ्यानं होण्यासारखं काम असलं तर मी अगदी आनंदानं करीन.'

'तुमच्यानं होण्यासारखं आहे म्हणून तर तुमच्याकडे आलों. पण तें अगदी गुप्त रीतीनं झालं पाहिजे मात्र,' शास्त्रीबुवांनी पुस्ती जोडली.

आज शास्त्रीबुवा मला आश्चर्यचकित करायचें ठरवून तर मजकडे आले नाहीत, असा विचार मनांत आला. त्यांच्या त्या २०–२२ वर्षांच्या बालविधवा मेहुणीशीं–सगुणेशीं–मला आतां हे लग्न करायला सांगणार, असाहि एक वेडा विचार माझ्या मनांत आला, आणि त्या दृष्टीने मी विचार करूं लागलों. सगुणा खरोखरच गुणी मुलगी होती. गृहकृत्यांत दक्ष आणि अप्रतिम सुंदर. शिक्षण मात्र पोथ्या वाचण्यापलीकडे गेलें नव्हतें. पण माझ्यासारख्या गरीबाला अशी कोण विदुषी माळ घालायला तयार झाली असती ? ती बालविधवा होती, पण मी पुरोगामी विचारसरणीचा होतो, तेव्हा त्याचा विचार करण्याची जरूर नव्हती. पण हें काम गुप्त कसें असेल, अशी शंका माझ्या मनांत आली व मग सगुणा म्हणजे देवाधर्माशिवाय कधीहि घराबाहेर न पडणारी, कादंबऱ्या न वाचणारी व सिनेमा न पहाणारी मुलगी आहे हें माझ्या ध्यानांत आलें व शास्त्रीबुवाहि

प्राण गेला तरी असलें कांही सांगणार नाहींत अशी खात्री झाली, आणि मी जरा निराशेनेच उद्गारलों, 'अगदी गुप्त ?'

'हो, अगदी गुप्त.' शास्त्रीबुवा म्हणाले. 'यांत आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे ? तुम्ही मला वचन द्या म्हणजे तुम्हाला सर्व कांही सांगतों.'

'वचनाची काय जरूर ? ज्याच्या शब्दावर विश्वास नाही त्याच्या...'

'तसं नव्हे,' शास्त्रीबुवा मला मधेंच थांबवून म्हणाले, 'तुमच्यावर विश्वास नाही तरमग कुणावर ठेवावयाचा ?' मला थोडें खुष करून शास्त्रीबुवा पुढे म्हणाले, 'मुलगा असल्याशिवाय मनुष्याला सद्गति नाही असं शास्त्र सांगतं. शिवाय आतां म्हातारपणीं कुणाचा तरी आधार पाहिजे. शिवाय देवळाची पूजा वगैरे चालवून त्याचं उत्पन्न पहायलाहि कुणी हवं'

मला लग्न करण्यासाठी गळ घालण्याऐवजी शास्त्रीबुवा स्वतःच्याच लग्नाबद्दल बोलणें करण्यासाठी मला कुठेंतरी जाण्याचा अग्रह करणार असें वाटून मी म्हटलें, 'मग एकंदरींत तुमचा पुनः लग्न करण्याचा विचार दिसतो. पण हें असलं मुलीच्या बापाजवळ बोलणं करणं आपल्याला नाही जमायचं बुवा. आपण या बाबतींत अगदी अनभ्यस्त आहोंत.'

'तुम्ही अलीकडची तरुण मंडळी अगदी उतावळी असतां,' शास्त्रीबुवा म्हणाले, 'अहो माझा लग्न करण्याचा विचार असता तरी आम्हाला मुलगी कोण देतो या वयांत ? त्यांतून एखादा गरजू पिता तयार झालाच, तर लग्न व्हायच्या आधीच तुम्ही मंडळी आम्हाला फाडून खाल ?'

'मग तुम्ही पुनर्विवाह कां करीत नाही ?' बुवांच्या बाबतींत पुनर्विवाहाची अशक्यता दिसत असूनहि मीं म्हटलं, 'तुमचं वय झालं असलं तरी तुमची अंगकाठी एखाद्या नवजवानालाहि लाजवील. करतां का पुनर्विवाह ?'

माझा प्रश्न ऐकून बुवा दचकले, पण स्वतःला सांवरीत म्हणाले, 'प्राण गेला तरी विधवाविवाहाला आपण तयार नाही. पण आज मी तुमच्याकडे आलों

तो मला एक दत्तक घ्यायचा आहे म्हणून.'

मी अविवाहित आहें हें माहीत असूनहि बुवांनी माझ्याजवळ दत्तकाची गोष्ट कां काढली हें मला समजेना. एकवेळ बुवांचा मलाच दत्तक घेण्याचा विचार असावा असेंहि वाटलें, पण पुनः माझ्यासारखा नवमतवादी त्यांना कधींच पसंत पडणार नाहीं असेंहि वाटलें. शिवाय त्यांचें तें देवदैवत मला मुळींच जमण्यासारखें नव्हतें. थोडा वेळ विचार करून मी म्हणालों, 'माझी एक दूरची मावसबहिण आहे. चार सुंदर अन् हुशार मुलगे आहेत बिचारीला. पण घरची गरीबी, त्यामुळं तुमच्यासारख्यांच्या इथं पडल्यास ती बहुतेक तयार होईल एखादा मुलगा दत्तक द्यायला.'

'माझा दत्तक मुलगा मी ठरवून ठेवलेला आहे' बुवा मधेंच म्हणाले, 'मागल्या खेपेस पंढरपूरला यात्रेला गेलों होतों तिथें पाहिला त्याला अनाथालयांत.'

'अनाथालयांत?' मी एकदम ओरडलों. आम्हा नवमतवाद्यांमधेंहि अनाथालयांतील मुलगा दत्तक घेणारे विरळाच, तेव्हा शास्त्रीबुवांसारख्यांनी आपण होऊन या गोष्टीला तयार व्हावें याचें मला मोठें नवल वाटलें. उगीच आम्ही जुन्या लोकांच्या नांवानें कंठशोष करतों, पण त्यांच्याहि अंतःकरणांत, दयेच्या रूपानें कां होईना, पण नवमतवाद्यांवरहि ताण करणारा एक भाग असतो असें मला वाटलें. पण पुनः त्यांचें मन पाहण्याच्या उद्देशानें मी म्हणालों, 'अहो अनाथालयांतील मुलांना ना जात ना पात. असलीं मुलं पुढं कशीं निपजतील कुणीं सांगावं? स्वतःच्या मनाविरुद्धच मी बोलत होतों.'

'असं नका म्हणूं. हा फोटो पहा बरं.' शास्त्रीबुवांनी खिशांतून एक फोटो काढून माझ्या हातांत देत म्हटलें.

सुमारें दीडदोन वर्षांचें एक गोंडस, सुंदर आणि चुणचुणीत पोर होतें तें. अनाथालयांत असलें तरी त्याची उत्तम निगा राखली जात असावी असें त्याच्या देहयष्टीवरून दाटे. फोटोंतील बाळाचें मधुर हास्य पाहून कुणाच्याहि मनाला मोहिनी पडावी. मी त्या फोटोकडे बराच वेळ पहात राहिल्याचें पाहून, कां कुणास

ठाऊक, शास्त्रीबुवांचे डोळे थोडेसे ओलसर झाल्यासारखे दिसले. ते उपरण्याने डोळ्यांत कांही गेलेलें काढल्यासारखें करून म्हणाले, 'कां, हा मुलगा पुढे फार नांवलौकिकास येईल असं नाही तुम्हाला वाटत ? फोटोवरून त्यांची जात सुद्धां ब्राह्मणच असली पाहिजे.'

जन्माच्या वेळेवरून, प्रश्न लिहिण्याच्या वेळेवरून, व फळांफुलांचीं नांवें घ्यायला सांगून भविष्य वर्तवणारे लोक मीं पाहिले आहेत, तीं खरीं ठरत नाहीत ही गोष्ट वेगळीं. पण फोटोवरून जात ओळखण्याइतके शास्त्रीबुवा ज्योतिषविद्येंत निपुण असतील अशी माझी कल्पना नव्हती. म्हणून मी जरा भीतभीतच प्रश्न केला, ' फोटोवरून जातपात आणि पुढचं भविष्य सांगणं जरा धाडसाचंच नाही का ?'

'तुम्हाला पहिल्यापासून सर्व कांही सांगतों.'बुवा आपलें आसन नीट स्थिर करून म्हणाले, 'ताकाला जाऊन भांडं लपवूं नये आणि वैद्यापासून रोग लपवूं नये. त्याचं असं झालं, आमची ही जेव्हा आजारी पडली, अगदी अंथरुणावरून उठवेना, तेव्हा सगुणेला बोलावून घेतली घरीं. मला जेवायला वाढणं, आंघोळीचं पाणी काढणं, सर्व गोष्टी सगुणाच करी. ती तरुण आणि सुंदर असल्यामुळं आम्ही दोघं लवकरच निसर्गाच्या मोहाला बळी पडलों. पुढं आमची ही मेल्यानंतर आमच्या या गोष्टी अप्रतिबंध चालू झाल्या. त्या वेळीं आम्हाला तुमचं तें संततिनियमन ठाऊक नव्हतं. '

' म्हणजे आतां चांगलं ठाऊक झालं आहे की काय ? ' मी मधेंच हटकलें.

' परिस्थितीनुसार सर्व गोष्टी आपोआप कळतात. मनुष्य एकदां पाप करूं लागला म्हणजे पुढं त्यांत पाप वाटेनासं होतं. '

' यांत मला तरी पाप दिसत नाही. ज्यापासून कुणाला सुख होईल किंवा कुणाचा फायदा होईल तें पुण्य, आणि ज्यापासून कुणाचं विनाकारण नुकसान होईल किंवा दुःख पोहोंचेल तें पाप. '

माझ्या भाषणानें बुवा स्तंभित झाल्यासारखे दिसले. मी विचारलें, ' तुम्ही सगुणाबाईंना कधी पुनर्विवाहाचं वचन देऊन त्यांची फसवणूक तर केली नाही ना ? '

' छे छे ! आमच्यासारख्या जुन्या घराण्यांत पुनर्विवाह अशक्य हें आम्हा दोघांसहि ठाऊक होतें, पण तिचीहि या प्रकाराला मनापासून संमति होती. पुढं तिला दिवस गेल्याचं दिसून आलं. कांहीं घरगुती औषधं केलीं तिनं, पण जेव्हा गुण आला नाही, तेव्हा नाइलाजानं चार महिने पाठवून दिलं होतं पंढरपूरला. '

' म्हणजे दोन वर्षांपूर्वी जेव्हा तुम्ही मला सगुणा भावाकडे गेली आहे कांही दिवस म्हणून सांगितलंत तेव्हा. '

' अहो कसला भाऊ न कसलं काय ? एक महिन्याचा मुलगा ठेऊन ती इथं आली. घरगुती औषधाचा गुण पूर्वी आला नाहीं, म्हणून त्याचं नांव ठेवलं आहे अविनाश. वीस रुपये महिना पाठवीत असतों मुलाच्या संगोपनासाठी. दोनचार वेळां जाऊनहि आलों यात्रेच्या निमित्तानं त्याला भेटण्यासाठी. पण आतां दूर ठेववत नाही हो त्याला ! शिवाय म्हातारपणीं स्वतःच्या रक्ताचा आधार असतांना त्याला दूर ठेवणें चांगलं कां ? दत्तक म्हणून कां होईना, पण त्याला घरीं कां आणूं नये ? आतां तुम्ही असं करा, तुमचं नागपूरजवळ बल्लारपूरला का कुठेसं घर आहे ना ? तेथून म्हणून तुम्ही त्या मुलाला पंढरपूरहून इथं आणायचं. मी इकडे तुमच्या दूरच्या नात्याच्या एका मुलाला दत्तक घेणार आहें म्हणून बातमी पसरवतों. मग तुम्ही आल्यावर दत्तविधान उरकून घेऊं. काय ? कराल ना माझं एवढं काम ? पैशाची सर्व व्यवस्था मी करतों. तुमच्यानं होण्यासारखं आहे हें काम. मग करता ना ? '

म्हाताऱ्याने अगदी दीनवाणीने शेवटचे शब्द म्हटले. मला विचार करायला फारसा वेळ लागला नाही. जगाची थोडी फसवणूक करून कां होईना, एक इष्ट काम होत होतें. जगाला खरें सांगून मुलाला आणणें शास्त्रीबुवांच्या बाबतींत शक्य नव्हतें. मी ताबडतोब होकार दिला आणि आठ दिवसांची रजा काढली. दुसरे दिवशींच मुहूर्त चांगला आहे असें शास्त्रीबुवा म्हणाले आणि व्यवस्थापकांच्या नांवाने लिहिलेलें एक पत्र त्यांनी मला दिलें आणि मी रवाना झालों.

पत्र वाचून व्यवस्थापकांनी फार समाधान व्यक्त केलें. थोडासा चहा वगैरे झाल्यावर त्यांनी मला अनाथालय दाखवलें. तेथे मागील बाजूस तो मुलगा एका सुमारें अठरा वर्षांच्या तरुणीबरोबर खेळत होता. ती पाठमोरी आणि जरा दूरच असल्यामुळे आम्ही आल्याचें तिच्या ध्यानांत आल्यासारखें दिसलें नाही. व्यवस्थापक म्हणाले ‘ ती मुलगी सुमारें दोन वर्षांपूर्वी मॅट्रिकच्या परीक्षेनंतर येथे सुटकेकरतां आली होती. तिला मुलगा होऊन तीनचार दिवसांतच तो वारला. पण मुलीचे आईबाप तिला परत घरीं घेईनात, म्हणून ती येथेच राहून अविनाशचा प्रतिपाल करते. ’ आम्ही जवळ गेल्यावर तिने वळून पाहिलें. त्या युवतीच्या सौंदर्याने मला क्षणभर मंत्रमुग्ध केल्याशिवाय सोडलें नाही. किती नीच असला पाहिजे तिला फसवणारा माणूस ! तिच्या चेहऱ्यावरील उदासपणा आणि डोळ्यांतील कारुण्य पाहून अंतःकरण पिळवटून निघालें अगदी माझें.

‘ नलू ! ’ व्यवस्थापकांनी हांक मारली. मी स्वतःशीच म्हणालों ‘ नांव तरी किती गोड ! ’ त्यांनी नलूस सर्व हकीकत सांगून मी उद्यां अविनाशला घेऊन जाणार असल्याचें सांगितलें. ती एक शब्दहि बोलली नाही पण तिची चर्या उत्तरोत्तर जास्त खिन्न होत गेल्याचें माझ्या दृष्टींतून सुटलें नाही. शेवटीं एक सुस्कारा टाकून ती नुसतें ‘ बरं ’ म्हणाली व अविनाशला घेऊन तेथून निघून गेली. नंतर आमचें बराच वेळ बोलणें होऊन मी दुसऱ्या दिवशीं नलूला–नलिनीला–व अविनाशला घेऊन पुण्यास जावें असें ठरलें व नलिनीचीहि याला अनुमति मिळाली. नलिनी माझी मानलेली बहिण झाली, व आम्ही पहाटे गाडींत बसलों. गाडींत मीं नलिनीला पुण्याच्या एकंदर परिस्थितीची कल्पना करून दिली. पुण्यास गेल्यावर तिनेहि शास्त्रीबुवांकडेंच उतरावें असें ठरलें व त्याप्रमाणे अविनाश व नलिनीस बुवांकडे पोंचवून मी आपल्या घरीं गेलों.

दत्तकविधि मोठ्या थाटाने पार पडला, पण पुढे दोनचार दिवसांतच ‘ आमच्या घरांत असली मुलगी खपायची नाही; इकडे शिवलेलं विटाळलं,

एकसारखं मुलाला घेऊन बसणं चांगलं नाही," अशा तऱ्हेचीं बोलणीं सुरू झालीं. आठ दिवसांनंतर तर नलिनीच्या हातांत दहादहाच्या दहा नोटा देत शास्त्रीबुवा म्हणाले, ' तुमच्यासारख्यांनी आमच्या घरांत राहणं आमच्या सनातनी मनाला खपत नाही. तुम्ही आतां परत जावं हेंच बरं. '

नोटा भिरकावून देऊन नलिनी रडतरडतच माझ्याकडे आली. मला सगळी हकीकत कळल्यावर वाटलें कीं जगाला ओरडून सांगावें हा बुवा ढोंगी आहे म्हणून. पण अविनाशाच्या सुखाकरतां नलिनीनें मला तसें करूं दिलें नाही. त्यानंतर नलिनी माझ्याकडे राहूं लागली, पण तिला दिवसांतून दोनचार वेळां तरी अविनाशला पाहून आल्याशिवाय राहवत नसें. शेजारीपाजारी म्हणत, ' पोटच्या गोळयाची माया एकाएकी कशी तुटणार ? '

नलिनीजवळ पंढरपूरला जाण्याची गोष्ट काढली कीं तीं एकदम रडूं लागे व म्हणे की ' मला काय ? कुठेहि राहिलं तरी सारखंच. ' अखेर जें काय व्हायचें असेल तें होईल, असें समजून मी पुन्हा तिच्या जवळ ती गोष्ट काढण्याचें सोडून दिलें. पण शास्त्रीबुवांना मात्र ही गोष्ट आवडली नाहीसें दिसलें. त्यांनी मला तसें कधी बोलून दाखवलें नाही, पण त्यांच्या वागणुकीवरून तसें दिसलें.

पुढें सुदैवाने माझी नागपूरला बदली झाली. नलिनीनेहि माझ्याबरोबर येण्याचा आग्रह धरला. पंढरपूरच्या गाडींत बसवून देतों म्हणून मी सकाळींच नलिनीसह स्टेशनावर गेलों व तेथील एका निवासांत तिला ठेवून दिलें. संध्याकाळीं शास्त्रीबुवांचा व इतर मंडळींचा मीं निरोप घेतला व रात्रीचे गाडीने पुण्याहून निघालों. नशीब बलवत्तर म्हणून स्टेशनावर पोंचवायला येण्याची कोणाला बुद्धि झाली नाही. नलिनीसह प्रवास फार मजेंत झाला नागपूरला आल्यानंतर आम्हीं लवकरच बिऱ्हाड थाटलें.

शास्त्रीबुवांचीं मधूनमधून पत्रें येतात व मीहि त्यांना त्रोटक उत्तरें पाठवतों. आज नागपूरला येऊन मला चार वर्षें झालीं. आतां पगारहि बरा मिळूं

लागला आहे. पण जेव्हाजेव्हा मी शास्त्रीबुवांना पत्र लिहितों, तेव्हातेव्हा माझ्या मनांत विचार येतो की अविनाशाला जगांत येण्यापूर्वीच नाहीसा करूं पाहणारे शास्त्रीबुवा, व तो जगांत आल्यानंतर त्यालाच दत्तक घेणारे शास्त्रीबुवा, स्वतःच्या कृत्याला लावलेली विचारसरणी इतरांच्या कृत्याला लावायला कां तयार होत नाहीत ! मग मला प्रश्न पडतो की मी कसें लिहूं शास्त्रीबुवांना की मी नलिनीशीं चार वर्षांपूर्वी लग्न केलें आहे म्हणून ?

गेल्या वर्षीच आम्हाला मुलगा झाला आणि त्याचेंहि नांव नलिनीच्या आग्रहास्तव अविनाशच ठेवलें आहे. मोठ्या अविनाशाचा फोटोहि आमच्या छोट्याशा बैठकीच्या खोलींत प्रामुख्यानें लावलेला आहे. पण तिच्या पूर्व चरित्राबद्दल, किंबहुना जातीपातींबद्दलहि विचारून आमच्या आनंदी जीवनांत विषाद पसरवण्याचा वेडेपणा मीं अजून केला नाहीं हें वाचकांना खरें वाटेल का ?

---

# सुप्रजाजनन

( प्रेस् मेडिकॅल वरून )

आगस्ट १९३८ चे प्रारंभीं पॅरिस येथे सुप्रजाजननसंस्थांची जी परिषद् भरली होती, तींत झालेल्या उद्बोधक चर्चेचा सारांश पुढें दिला आहे. या परिषदेस ब्राझिल्, फ्रान्स, इटाली, मेक्सिको, पोर्तुगाल, आणि रुमॅनिआ, या देशांतील प्रतिनिधि हजर होते.

अध्यक्ष डॉ. आपेर् यांनी प्रथम सांगितलें की आनुवंशिकतेचे जे नियम आतां कळलेले आहेत, त्यांची मनुष्यजातीच्या उन्नतीला मोठी मदत होण्यासारखी आहे आणि याचें उदाहरण म्हणून मनुष्येतर प्राण्यांत आणि धान्यांत या नियमांच्या साह्यानें इष्ट गुण कसे निर्माण करतां आलेले आहेत हें त्यांनी दाखवून दिलें. मनुष्यप्राण्यालाही हेच नियम अर्थातच लागू पडतात, परंतु मनु-

ष्याचे बाबतींत त्यांचा फायदा घेणें जास्त कठिण आहे, कारण विशिष्ट जनसमूहाला हे नियम लावणें झाल्यास तेथील समाजाची स्थिति, राजसत्ता, चालीरीति, आणि प्रचलित नीतीच्या कल्पना, या सर्वांचा विचार केला पाहिजे. म्हणजे हा केवळ शास्त्रीय ज्ञानाचा प्रश्न न राहतां समाजनियंत्रणाचा प्रश्न होईल.

समजा मिश्रविवाहाचा प्रश्न घेतला, तर त्यासंबंधी रक्त शुद्ध राखण्याची जरूरी जोरजोराने पुढे मांडण्यांत येते, पण वास्तविक पाहिलें तर प्रस्तरयुगाच्या शेवटीं देखील यूरोपांत शुद्ध रक्ताचे कोणीही लोक शिल्लक नव्हते, आणि त्यानंतर देशांतर, स्वाऱ्या, लढाया, आणि सामाजिक दळणवळण, यांमुळे रक्ताचें मिश्रण इतकें होत आलेलें आहे, आणि शिवाय शास्त्रीय रक्ताचे जे चार वर्ग केलेले आहेत, तेही सर्वत्र इतक्या प्रमाणांत सांपडतात, की यापुढें रक्ताचें मिश्रण म्हणजे मिश्र रक्ताचेंच पुनर्मिश्रण होय. अर्थात् नीग्रो किंवा चिनी लोकांची गोष्ट वेगळी, पण यूरोपांतील देशांत आपआपसांत तरी आतां मिश्रविवाहाने रक्ताचें मिश्रण होतें या म्हणण्यांत कांही अर्थ नाही. राष्ट्र वेगळें झालें म्हणजे रक्ताचे गुण बदलतात असें नाही. त्यांची संस्कृति वेगळी असूं शकेल, आणि आपल्या समाजाबाहेर कोणी विवाह करूं नये असें वाटणें साहजिकच आहे, पण त्यांत रक्ताचा प्रश्न येत नाही. परंतु आपल्याला येथे आनुवंशिकतेच्या नियमांचा शास्त्रीय विचार कर्तव्य आहे, सामाजिक समजुतींचा नव्हे. यानंतर पुढील विषयांवर चर्चा झाली.

**मिश्र संतति आणि देशांतर.** रने मार्सिआल यांनी सांगितलें की देशांतरांत आर्थिक प्रश्न मुख्य आहे असें कित्येकांस वाटतें, तथापि वस्तुतः तो गौण आहे. मुख्य प्रश्न हा आहे की देशांतरामुळे मिश्रविवाह होतात, आणि त्यामुळे शारीरिक व मानसिक दृष्ट्या भिन्न अशा माणसांचा संबंध झाल्यामुळे कांही शारीरिक व मानसिक दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. आनुवंशिकतेचा प्रश्न केवळ प्रयोगशाळेंतील प्रयोगांवरून निकालांत काढतां येणार नाही, निसर्गांत काय होतें हेंही पहावें लागेल. यावरून असें दिसतें की मिश्रविवाह नेहमीच वाईट नसले तरी कधीकधी परिणाम वाईट दिसतात. ज्या मिश्रविवा-


हाची संतति भोंवतालच्या समाजांत सहज मिसळूं शकते, तें सामान्यतः चांगलें. मिश्रविवाह कधी कायद्यावर तर कधी आवडीनिवडींवर अवलंबतात. उदाहरणार्थ इंग्रज व फ्रेंच यांचे विवाह फारसे होत नाहीत, हा आवडीचा प्रश्न झाला. पण बायबलांतील हकीकत पाहिली तर असें दिसतें की ज्यू लोकांस इतरांशी विवाह करण्याची मनाई होती. अमेरिकेंतील तांबडे लोक व फ्रेंच यांचें मिश्रण चांगलें होतें आणि या मिश्रणाने कॅनडामधें फ्रेंचांची संख्या अधिक वाढली. याच्या उलट फ्रेंचांचें व पिंवळया लोकांचें मिश्रण झाल्यास संतति पिंवळ्यांतच मिसळून जाते, तेव्हां त्यांत फायदा नाही.

रक्ताचें मिश्रण हें फार जुनें आहे हें जरी खरें असलें, तरी सातशें आठशें वर्षेपर्यंत मिश्रणाशिवाय राहिलेले लोक सांपडत नाहीत असें नाहीं, आणि कधीकधी अशा लोकांत परकी रक्त मिसळल्यास त्यांची अधोगति किंवा नाशही होणें शक्य आहे. आनुवंशिक वेड हा रक्तमिश्रणाचा एक परिणाम आहे. रक्ताच्या चार प्रकारांपैकी फ्रान्समध्यें '०' व 'ए' जास्त सांपडतात. पौर्वात्य लोकांत 'बी'चें प्रमाण जास्त आणि या रक्ताचें 'ए'शीं जमत नाहीं, आणि '०' रक्ताला कमीपणा येतो.

यावर आपेर यांनी असें मत दिलें की आपल्यापेक्षा फारसे वेगळे नसलेल्या लोकांना देशांत येऊं देण्यास हरकत नसावी, उदाहरणार्थ दक्षिण फ्रान्समधें इटालिअन् किंवा स्पॅनिश् लोकांना घेण्यास हरकत नाही.

जॉर्ज श्रायबर म्हणाले की सुप्रजाजननाचा प्रश्न फार गुंतागुंतीचा आहे. उदाहरणार्थ एका देशांत सुप्रजाजननास इष्ट ते कायदे करून आदर्श माणसें उत्पन्न झालीं ती इतरांना आदर्श वाटणार नाहीत. उदाहरणार्थ लढाऊ लोक उत्पन्न केले तर ते इतरांना त्रास देतील. तेव्हा मनुष्यजातीच्या दृष्टीने आदर्श म्हणजे काय हें ठरवणें जरूर आहे.

श्री. लेतार यांनी मनुष्येतर प्राण्यांची उदाहरणें दिलीं. आज शुद्ध इंग्रजी रक्ताचा म्हणून समजलेला जो शर्यतीचा घोडा असतो, तो शुद्ध





रक्ताचा नसून त्यांत ग्रेट् ब्रिटन्, तुर्कस्तान, नेपल्स, स्पेन, अरबस्तान, इतक्या ठिकाणच्या अश्वरक्तांचें मिश्रण आहे असें वंशावळींवरून दिसतें. त्याचप्रमाणे एक लोंकरीच्या दृष्टीने उत्तम, व एक मांसाच्या दृष्टीने उत्तम, अशा दोन जातींच्या मेंढरांचें मिश्रण १८३० सालापासून झालेलें असून आतां त्यापासून दोन्ही दृष्टींनी चांगली अशी एक नवीनच जात उत्पन्न झाली आहे. अर्थात् मिश्रसंततींत चांगल्या गुणांप्रमाणे वाईट गुणही एकवटूं शकतील, पण मनुष्येतर प्राण्यांत याला महत्व नसतें, कारण असे प्राणि मारतां येतात. मनुष्यांच्या वेग-वेगळ्या जातींत असे वेगवेगळे गुण शोधून काढणें इतकें कठिण असतें की आनुवंशिकतेचे नियम मनुष्याला लावतांना जातींपेक्षा व्यक्तींच्याच गुणांचा विचार करणें अधिक फलप्रद होईल.

**लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न.** लोकसंख्या किती वाढते किंवा कमी होते हें कळण्याकरता संख्येची मोजणी करतात, तशीच मोजणी लोकांच्या गुणांच्या बाबतींतही झाली पाहिजे. याकरतां वैद्यकीय दृष्ट्या शरीराची तपासणी, आणि शिवाय मानसिक गुणांची परीक्षा केली पाहिजे. अशी परीक्षा सर्व लोक-संख्येची करणें कदाचित् शक्य झालें नाहीं तर ती विशिष्ट समूहांचीच घ्यावी. उदाहरणार्थ शाळेंतील मुलें, लष्करांतील शिपाई, विशिष्ट धंद्यांतील लोक, वगैरे.

श्री. केल यांनी ५००विवाहित जोडप्यांविषयी मिळवलेली माहिती सांगि-तली. यांपैकी ३३ श्रीमंत, १६६ सुखवस्तु, आणि ३०१ गरीब होतीं. जिवंत मुलांची संख्या श्रीमंत कुटुंबांत सर्वांत अधिक आणि गरीब कुटुंबांत सर्वांत कमी होती. या चौकशीवरून असेंही दिसलें की ज्यांना मुलें जास्त होतात, त्यांच्या मुलांत मृत्यूचें प्रमाणही जास्त असतें. उदाहरणार्थ एकच मूल असणारांच्या मुलांपैकी शेंकडा ६.४ मरतात, आणि ९ मुलें असणारांच्या मुलांत शेंकडा ३०.८ मरतात. तेव्हा ज्यांना मुलें वाढवतां येत नाहीत त्यांना मुलांची संख्या मर्यादित ठेवण्यास शिकवलें पाहिजे. ही माहिती ' रिओ दि जानेरो ' येथील आहे.

जॉर्ज् श्रायबर् हे फ्रान्समधे गरीब कुटुंबांना मिळणाऱ्या मदतीसंबंधी

म्हणाले की ही मदत मुलांची संख्या वाढावी या हेतूने देतात. या मदतीचा उपयोग सुप्रजाजननाकरतां व्हायला पाहिजे असल्यास, ज्या आईबापांना मदत करायची, त्यांत आनुवंशिक दोष नसावेत, आणि त्यांचीं मुलें निरोगी व सशक्त असावीं. आणि जे मुलांचें संगोपन नीट करणार नाहींत त्यांना मदत बंद करावी. या शिवाय जर्मनीप्रमाणे फ्रान्समधेही शारीरिक व मानसिक दृष्ट्या इष्ट अशा तरुणतरुणींना लवकर लग्न करतां यावें व मुलेंही पुष्कळ व्हावीं याकरता देखील मदत केली पाहिजे. जर्मनींत ही पद्धत १९३५ पासून सुरू झाली आहे.

**वेगवेगळया दर्जाच्या लोकांची कमीअधिक वाढ.** मुलांची संख्या मर्यादित करण्याची प्रवृत्ति वरच्या दर्जाच्या लोकांत जास्त दिसून येते.

मिस व्हीदा म्हणाल्या की जेथे बंद जाती असतात, तेथे वरच्या दर्जाचे लोक हळूहळू अधोगतीला जातात, परंतु खालच्या लोकांना वर येण्यास वाव असल्यास उत्तरोत्तर सुधारणाच होत जाते.

**स्त्रीबीजांचे व पुंबीजांचे रोग व त्यांवर उपचार.** उंदरांवर प्रयोग करून असें सिद्ध झालें आहे की अन्नांत कांही विशिष्ट द्रव्यांची उणीव, आणि अन्न फाजील किंवा कमी खाणे, या कारणांचा परिणाम संततीवर होतो. उदाहरणार्थ प्रोटीन् व व्हिटॅमीन् ‘ बी ’ हीं कमी पडल्यास नराच्या प्रजोत्पादनशक्तीवर फारसा परिणाम होत नाही, तरी मादीच्या जननशक्तीवर होतो. आणि हें प्रोटीन बहुतेक प्राणिजन्य असावें लागतें.

पुरुषाचें रेत व समागमानंतर स्त्रीच्या इंद्रियांतील द्रव घेऊन त्यांचें मिश्रण करून सूक्ष्मदर्शक यंत्राने तपासतां निरोगी पुरुषाचें रेत आणि क्षयरोगी पुरुषाचें रेत यांत उघड फरक दिसतो. तेव्हा हा रोग आनुवंशिक आहे यांत शंका रहात नाही. परंतु गर्मीच्या बाबतींत मात्र असा नक्की पुरावा मिळाला नाही.

श्री. शांपी यांनी सांगितलें की अंतःस्रावग्रंथीचें कार्य योग्य किंवा कमजास्त होणें हेंही आनुवंशिकतेवर अवलंबतें. पक्ष्यांवर प्रयोगांतीं असें दिसतें की

अंतःस्राव किती होतो यांत आनुवंशिकतेमुळे फरक दिसत नाही, परंतु त्या अंतःस्रावांचे कार्य ज्या इंद्रियांवर व्हायचें त्यांची प्रतिक्रिया मात्र आनुवंशिकतेने कमीअधिक प्रमाणांत होते.

दारूबाजीचा परिणाम एकंदरींत संततीवर वाईट होतो इतकेंच नव्हे, तर दारूबाजीची प्रवृत्तिही आनुवंशिक आहे. ग्रनिअे यांनी असें दाखविलें आहे की आईबापांपैकी एकच दारूबाज असेल तर संततीपैकी शेंकडा ५२ दारूबाज होतात., आणि दोन्ही असतील तर शेंकडा ८४ दारूबाज होतात. इंग्रज शास्त्रज्ञ पिअरसन् याने १९११ सालीं असें सांगितलें की मानसिक दोष आनुवंशिक असतात, आणि मानसिक दोषांमुळे मनुष्य दारूबाज होतो.

कॅन्सर हा रोग आनुवंशिक असतो की काय याबद्दल बरेच दिवस शंका होती, परंतु ती आतां नाही. मॉड स्लाय या अमेरिकन बाईनी उंदरांच्या कित्येक पिढ्यांचें अवलोकन करून असें सिद्ध केलें आहे की कॅन्सरची प्रवृत्ति हा एक आनुवंशिक गुण आहे, त्याला मेंडेलचे नियम लागू पडतात, परंतु हा गुण मागें पडणारा आहे ( रिसेसिव्ह कॅरॅक्टर् ). ज्या व्यक्तींत ही प्रवृत्ति असते, त्यांत एखाद्या बारीकशा जखमेचें देखील कॅन्सरमध्यें रुपांतर होतें, व इतरांना होत नाही. मॅदॅम डोब्रोव्होल्स्काया–झाव्हाल्स्लाया यांनी देखील अशाच प्रकारचें संशोधन करून हेंच अनुमान काढलें आहे, पण त्यांना क्वचित् प्रसंगीं कॅन्सर आनुवंशिक नसतांनाही उद्भवतो असें आढळलें. तथापि हें उंदरांविषयींचें संशोधन मनुष्यांना लावतां येईल की नाही याची शंका आहे.

नंतर मानसिक दोष कितपत आनुवंशिक असतात यासंबंधी चर्चा झाली आणि कांही पिढ्यांत आनुवंशिक दोष दिसल्याशिवाय सक्तीच्या शस्त्रक्रियेने संतति बंद करूं नये असें कांहींचें मत पडलें.

**आईबापांचें वय, मुलांची संख्या व अमुक मुलाची अनुक्रम-संख्या यांचा मुलांवर काय परिणाम होतो ?** यासंबंधी १९३५ ते १९३७ या सालांत पॅरिसमधील सूतिकागृहांत ११०० बाळंतिणींजवळ चौकशी करून तीन

डाक्तरांनी अशी माहिती दिली की उपजतांना मुलाचें वजन आनुवंशिकतेवर अवलंबतें. मुलें फार झालीं नाहीत तर नंतरच्या मुलांचें वजन उपजतांना जास्त असतें, परंतु पुष्कळ मुलें झाल्यास मात्र शेवटच्या कांही मुलांना हा नियम लागू पडत नाही. या वजनावर आईबापांच्या वयाचा परिणाम होत नाही. जास्त मुलें झाल्यास त्यांचा मानसिक दर्जा कमी असतो की काय, याबद्दल एकमत झालें नाहीं.

पांचांपेक्षा कमी मुलें असलेलीं १७० कुटुंबें, आणि पांच किंवा जास्त मुलें असलेलीं ८४ कुटुंबें तपासतां दोन डाक्तरांना आढळलें की ५,६ किंवा ७ मुलें असलेलीं कुटुंबें एकत्र घेतल्यास त्यांतील शेंकडा १५ मुलें मरतात. आठ किंवा जास्त मुलें असलेल्या कुटुंबांत शेंकडा १८ मुलें मरतात. आठ किंवा कमी मुलें असलेलीं कुटुंबें घेतल्यास हें प्रमाण शेंकडा ८ पडतें. जास्त मुलें विशेषतः गरीब स्थितींतील कुटुंबांत दिसतात, तेव्हा जास्त मुलें मरण्याचीं कारणें त्यांचें अज्ञान व गरीबी असणें शक्य आहे. या दृष्टीने बाळंतपणापूर्वी व नंतर गरीब आयांना वैद्यकीय मदत मिळणें जरूर आहे.

डॉ. ब्रूझो म्हणाले को वेडगळपणा हा एक आनुवंशिक गुण आहे, आणि अशा लोकांचे विवाहबाह्य संबंध जास्त होतात. हे लोक कृत्रिम साधनें वापरीत नाहीत आणि यामुळे एकंदर जन्ममान कमी झालें तरी वेडगळांचे जन्ममान कमी होत नाही.

बुकारेस्त येथील डॉ. बानू यांनी सांगितलें की सुप्रजाजननाच्या दृष्टीनें तावडतोब करतां येण्यासारख्या गोष्टी म्हणजे विवाहापूर्वी आरोग्याचा दाखला दाखविण्याची सक्ती करणें, आनुवंशिकतेचा शास्त्रीय अभ्यास करण्यास मदत करणें, आणि वेडगळ लोकांना शस्त्रक्रियेने वंध्यत्व आणणें. यासंबंधी प्रथम सौम्य कायदा करावा.

---

# पाठच्या बहिणी

लेखिका, **शकुंतला परांजपे**

एकाच आईबापांच्या दोघी पाठच्या मुली. वयांत अंतरहि दीडच वर्षांचें. पण दोघी दिसायला आणि असायला किती भिन्न ! एक गोरी तर दुसरी काळी, एकीचें नाक धरधरीत तर दुसरीचें बसलेलें, एकीचे डोळे काळे तर दुसरीचे घारे, एकीचे केस कुरळे तर दुसरीचे सरळ, एकीचें दांत मोत्यांच्या ओळीसारखे तर दुसरीचे वाकडे. तिकडे एकीची छाती फुगीर तर दुसरीची सपाट, एकूण तारा सुंदर आणि सुमति कुरूप, तारा लाजरी आणि भित्री, तर सुमति धीट आणि धाडशी, तारा गोडबोली आणि धोरणी तर सुमति फटकळ आणि स्पष्टवक्ती, तारा गरीब आणि कोंवळ्या मनाची तर सुमति भांडखोर आणि खुनशी, तारा आळशी तर सुमति मेहनती, तारा लहान तर सुमति मोठी. परंतु तारा जसजशी वयांत येऊं लागली तसतशी ती सुमतीपेक्षा मोठी दिसूं लागली. तारुण्यांतील सर्व मोहकपणा तिच्यावर झळकूं लागला, तिचा बांधा अधिकाधिक गोंडस दिसूं लागला, तिला नहाणहि सुमतीच्या आधींच आलें. ती रस्त्याने चालली की लोक तिच्याकडे वळवळून पहात. एकदां दोघी रस्त्याने चालल्या असतां कोणसें पुटपुटलें 'दोन चित्रें, रंभा आणि शूर्पणखा ' सुमतीच्या डोळ्यांत आसवें चमकलीं. तिने आपलें तोंड फिरवलें तरी ताराच्या तें ध्यानांत आल्यावांचून राहिलें नाही. तिने सुमतीचा हात प्रेमाने आपल्या हातांत घेतला, पण तो झिडकारीत सुमति म्हणाली 'पुरे झालं. मानभावी कुठची ! '

' असं काय ग सुमन ? माझा ग काय दोष आहे त्यांत ? '

' तुझा नाही, माझाच दोष आहे. '

' दोष कुणाचाच नाही. असल्या कुटाळ लोकांची बडबड तूं उगीच मनाला लावून घेऊं नको गडे. तुझं मन खट्टू झालं म्हणजे मला फार वाईट वाटतं.'

' तर तर ! आपल्या रूपावर सगळं जग भाळतंसं पाहून अगदीं भयंकर वाईट वाटत असेल तुला नाही ?'

' मग मी काय मुसलमान बायकांसारखी बुरखा घेऊं तोंडावर ? म्हणजे होईल तुझं समाधान ? सांग. '

' सांगू ? तूं आपलं नाक कापून टाक म्हणजे माझा तळतळाट कमी होईल. '

' त्याने तुझं नाक सरळ होईल का ? ' अखेरीस चिडून ताराने उत्तर दिलें. सुमति फणफणत तेथून जी निसटली ती झपझप पावलें टाकीत डोंगराच्या बाजूला गेली. त्या दिवसानंतर सुमति ताराबरोबर कधीहि बाहेर पडली नाही. फार काय, घरच्या घरीं सुद्धां ती आपल्या बहिणीला चुकवीत असे. घरीं वडिलांनी वारंवार म्हणावें, ' या नकटीला उजवतां उजवतां माझ्या नाकीं नऊ येणार आहेत. ' तिच्या आईला मात्र अशा तऱ्हेचे उद्गार झोंबत. तिने तिची बाजू घेऊन म्हणावें, ' तिच्यासाठी देखील परमेश्वराने कोणी तरी वर योजून ठेवला असेल. ' लहान असतांना तारा एकदां विषमाने आजारी पडली होती. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें होतें. परंतु ' देवा, तारा या दुखण्यांत मरूं दे ' म्हणून देवाची प्रार्थना केल्याचें सुमतीला अजून आठवत होतें. सुंदर आणि गोड स्वभावाची म्हणून ताराच सर्वांना आवडे. एकदां एका चुलतभावाच्या लग्नाचीं दोघींना पातळें आलीं होतीं. सुंदर फिक्या बदामी रंगाचें होतें तें काकूने ताराला दिलें व काळपट रंगाचें होतें तें सुमतीच्या हातीं देत ती म्हणाली, ' तुला आपलं हेंच बरं, नाही का ग ? ' ' मला काळुंद्रीला मुळी हवंच कशाला नवं पातळ ? तुझं एखादं जुनेरं असलं तर दे. ' म्हणून दांतओठ खात हातचें पातळ भिरकावून देऊन ती निघून गेली. ताराला काकूचा राग आला होता आणि ती जातांक्षणीं आपल्या बदामी पातळाच्या निऱ्या करून ती सुमतीकडे गेली आणि तिला तें नेसायचा आग्रह करूं लागली. सुमति जास्तच गरम झाली. ' हें बघ तारा, काकूचं आणि सगळ्यांचं हिणवणं

एक वेळ पुरवलं, पण तुझी कींव नको. तूं नेस आपलं तुझं पातळ. माझ्या अंगाचा स्पर्श झाला तर काळं व्हायचं एखाद वेळेस.'

दोघींहि एकाच वर्गांत होत्या. गांव लहानसेंच असल्यामुळे तेथे मुलींचें वेगळें हायस्कूल नव्हतें. त्या मुलांच्याच शाळेंत जात असत. शिवाय त्यांचे वडिलच शाळेचे हेडमास्तर होते. तेथेहि सुमतीच्या जिव्हारीं वारंवार घाव बसत. एकदा जवळच्या बांकावर दोन मुलगे बोलत बसले होते. 'काय रे, तूं म्हणे कालच्या सामन्यांत पहिला नंबर मारलास?' 'हो ना. आणि तूं लेका कुठे हजामती करीत बसला होतास?' 'मी ना? झोप काढली बघ. कोण शिंचा रोज सकाळीं उठून चढाओढीकरतां शाळेंत यायला बसला आहे? झक मारीत रोज दुपारीं यावं लागतं तेवढं बस्स झालं.' इतक्यांत तिसरा एक विद्यार्थी त्यांच्यांत सामील होत म्हणाला 'लेकहो, माहीत आहे का? शाळेंतील सर्वांत हुशार विद्यार्थी म्हणून साळ्या तुला बक्षिस मिळणार आहे, आणि जोशा लेका, तुला शाळेंतील सर्वांत चुकार मुलगा म्हणून...' 'आम्हाला काय बुवा मिळणार आहे?' 'सांगूं? हेडमास्तर सुमतीला तुझ्या गळ्यांत घालणार आहेत.' 'अरे बापरे! आहे खरी शिक्षा.' 'आणि बक्षिस म्हणून मला तारा मिळणार आहे का रे?' संभाषणाचा शेवटचा भाग जरी हळू आवाजांत बोलण्याची मुलांनी खबरदारी घेतली होती, तरी तें दोघी बहिणींना ऐकूं आल्यावांचून राहिलें नाहीं.

मॅट्रिक झाल्यावर दोघींना पुण्यास फर्ग्युसनमध्यें पाठवण्यासंबंधी बोलणें सुरू झालें. तेव्हां सुमतीने आपला निर्धार प्रकट केला. 'मी मुलांच्या कालेजांत जाणार नाहीं, मी आपली येरंडवण्यास जाईन.' ताराला व तिच्या आईला या बोलण्यांतील खोंच उमगली होती. तारा फर्ग्युसनमधें जाऊं लागली, सुमति येरंडवण्यास दाखल झाली. दोघीहि आपआपल्या कॉलेजच्या वसतिगृहांत रहात असल्यामुळे एकत्र येण्याचे व सुमतीची मत्सराची जखम वरचेवर उकलून येण्याचे प्रसंग उद्भवेनात. सुमति मोकळेपणाने वागूं लागली, तिचा कुडेपणा व

खुनशीपणा अजीबात नाहीसा झाला, तिच्या तोंडावर हुरूप व उल्हास दिसूं लागला. पोहण्यांत तिने अनेक शर्यती जिंकल्या. आसनें करण्यांतहि ती पटाईत झाली, आणि वक्तृत्वांत तर ती कोणाला हार जात नसे. तिच्या बोलण्याचालण्यांत एक प्रकारचा निर्भयपणा व प्रांजलपणा दृग्गोचार होऊं लागला. तिच्या काळ्या चेहऱ्यांतील घाऱ्या निर्मळ डोळ्यांत एक विलक्षण तेजस्वी चमक मारूं लागली. कृतीने ती नेहमीच सडेतोड होती. कोणाशींहि बोलतांना ती तोंड वर करून सरळ त्या व्यक्तीकडे पाही. तिने सर्वांचा विश्वास संपादन केला व ती मुलींना व शिक्षकांना हवीहवीशी वाटूं लागली. नुकतीच ती सर्वानुमतें क्रीडांगणाची चिट-णीस म्हणून निवडून आली होती. आपल्याला जगांत किंमत आहे हें समजल्यापासून सुमति आनंदांत होती. कधीकधीं सिंहावलोकन करतांना ताराचें आपल्यावरचें प्रेम व तिच्याविषयींचा पूर्वींचा आपला तुसडेपणा व मत्सर आठवला की तिला पश्चातापहि होई. एकदां तर तिने ताराजवळ आपल्या पूर्व वर्तनाबद्दल स्फुंदत-स्फुंदत माफी सुद्धां मागितली होती. तारालाहि भरतें आलें. दोघीहि एक-मेकींना मिठ्या मारून किती वेळ तरी रडल्या, परंतु दुसऱ्याच दिवशीं तारा सुमतीच्या खोलीवर जेव्हा प्रथमच आली, आणि येरंडवण्याच्या पोरींनीं ताराच्या सौंदर्याची जेव्हा तारीफ केली, तेव्हा मात्र सुमतीच्या मत्सराने फिरून उचल खाल्ली. तिचा मोकळेपणा पार नाहीसा झाला आणि तिला अस्वस्थ वाटूं लागलें. तारा गेल्यावर एक मुलगी तिला म्हणाली, 'ही तुझीच बहिण म्हणून मला कधी खरं सुद्धां वाटलं नसतं.' 'सांगून टाक एकदां ती सुरेख आहे आणि मी कुरूप आहें म्हणून, म्हणजे सुटलीस.' सुमतीने ताराला फिरून कधी आपल्या खोलीवर बोलावलें नाही.

इकडे ताराहि आपल्या कॉलेजांत चमकत होती. आधीच लावण्याची खाण आणि तशांत गोड स्वभाव. ती मूळची जरी भित्री आणि लाजरी होती, तरी कॉलेजांतील मोकळ्या वातावरणांत ती हळूहळू सभाधीट होऊं लागली. वेगवेगळ्या मंडळांचे चिटणीस कामाच्या निमित्ताने तिची ओळख करून घेण्याचा

प्रयत्न करूं लागले. तिला टेनिस किंवा बॅडमिंटन मुळीच खेळतां येत नव्हतें, परंतु तिला भागीदारीण करून घेण्यासाठी मुलांच्या उड्या पडत. ती वादविवादांत अलीकडे भाग घेऊं लागली होती. व्यासपीठावर उभी राहतांच तिला टाळ्या पडत. तिचा आवाज जरा कोताच होता, तरी मुलें तिचें भाषण शांतपणें ऐकून घेत. मग तें ऐकून घेत की तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पहात रहात तें ते स्वतःच जाणोत. सुंदर मुलीला हजार खून माफ नसतात का ? एकदां वादविवादाच्या इंटरकॉलेजिएट चढाओढींत फर्ग्युसन व येरंडवण्याचा सामना होता. फर्ग्युसनच्या बाजूने तारा व दोन मुलगे बोलणार होते. ताराने ठराव मांडला. भाषण बेताचेंच झालें, पण टाळ्यांचा कडकडाट झाला. ठरावाला पहिला विरोध सुमतीचा होता. ती ताराचीच बहिण असल्याची कुणकुण मुलांना आधीच लागली होती, व ती उभी राहण्याची ते उत्सुकतेने वाट बघत होते. अध्यक्षांनी तिला पाचारण केलें. ती व्यासपीठावर आली मात्र, कुजबुज सुरू झाली ' अरे हीच का ताराची बहिण ? ' ' लेका कुठे ही आणि कुठे ती ? ' ' येरंडवण्याला परत जा.' सुमतीला शांतपणें कोणीहि बोलूं देईना. अध्यक्षांनी दोनदां घंटा वाजवली. मुलें जास्तच गोंगाट करीत. फाडफाड बोलणारी सुमति या हल्ल्याने चीत झाली व भाषण अर्धेंच टाकून खाली बसली. सभा संपल्यावर तारा तिला आपल्या खोलीवर बोलावीत होती, पण मानेनेच नकार देत सुमतीने कालव्याचा रस्ता धरला आणि खोलींत येऊन ती मनसोक्त रडली. भरून आलेल्या जखमेंतून भळभळा रक्त वाहूं लागलें. ' केवळ सौंदर्याच्या जोरावर ताराच्या अगदी सामान्य भाषणाला टाळ्या पडल्या आणि माझें भाषण मुलांनी नुसतें ऐकून सुद्धां घेतलें नाही. मुलांच्या कॉलेजांत जायची मला कोठून दुर्बुद्धि झाली ? '

दहा दिवसांनी सुट्टी होऊन मुली घरोघर जाणार होत्या. सुमतीला सुट्टी म्हणजे महासंकट वाटे. सुट्टी म्हणजे घर, घर म्हणजे ताराचा सहवास आणि आपली कुचेष्टा. या सुट्टींत तिने कॉलेजांत राहण्याची परवानगी मिळवण्याची खटपट

केली, परंतु एका मुलीकरतां वसतिगृह उघडें ठेवतां येत नाही असें उत्तर मिळालें. इकडे आईवडिलांनी सुमतीच्या लग्नाची खटपट चालविली होती. कोठे कांही जुळेना. कोणी म्हणत नकटी आहे, कोणी म्हणत काळी आहे, कोणी म्हणत दांत वाईट आहेत. निरुपाय म्हणून वडिलांनी हुंड्याची लालूच दाखवायलाहि सुरवात केली होती. एकदां तर एक बिजवर कारकून सुमतीला पहायला आला होता. एक हजाराचा हुंडा देऊं केला होता. अशा वेळीं आई ताराला स्वयंपाकघरांत ठेवून घेई. परंतु इतक्यांतच ताराच्या परीक्षेची तार आली व निकाल पहाण्याकरतां ती धांवत-धांवत ओटीवर गेली.लागलीच पहायला आलेल्या इसमाने ही कोण म्हणून पृच्छा केली. सुमतीची पाठची बहिण असें कळतांच आपण कवडीचाहि हुंडा न घेतां हिच्याशीं लग्न करायला तयार आहों म्हणून त्याने सांगितलें. ताराचें लग्न इतक्यांत करायचें नाही असें सांगून त्याची कशीबशी बोळवण केली. वडिलांच्या अंगाचा तिळपापड उडाला होता. 'तारा द्या म्हणे. भिकारडा कारकून तर कारकून आणि मिजास केवढी? म्हणे तारा द्या! आणि त्यांतून बिजवर. तारा हवी याला! तिचे जोडे पुसायची तरी लायकी आहे का चोराची? एखादा संस्थानिक नाक घाशीत येईल माझ्या ताराकरतां. म्हणे या माकडाला द्या!' स्वयंपाकघरांत सुमति आईच्या ओच्यांत तोंड लपवून हुंदके देत होती. 'आई, कशाला ग मला जन्म दिलास? निदान माझं काळं तोंड दृष्टीस पडल्यावर तरी माझं नरडं दाबायचं होतंस.' आईचा जीवहि सुमतीकरतां तिळ तिळ तुटत होता.तिला 'उगी उगी, असं काय वेड्यासारखं बोलावं?' म्हणत तीहि अश्रू ढाळीत होती. बाहेर मोठमोठ्याने वडिलांचा तळतळाट चाललाच होता. तो टळावा या उद्देशाने आई सुमतीला म्हणाली, 'सुमन, माझ्याबरोबर कैलासनाथाला येतेस का? चल जरा मोकळें वाटेल तुला आणि मलाहि.' सुमति कांही न बोलतां डोळे पुशीत उठली. आईने पसाभर तांदूळ ओच्यांत घातले आणि एक पैसा कडोसरीला खोंवला. देवळांत जाऊन तिने मनोभावानें देवाला नमस्कार केला आणि कांहीतरी नवस केला. सुमति बाहेरच पायरीवर बसली होती. आई बाहेर येते तों एक ओळखीच्या बाई देवाला आल्या होत्या. 'थांबा की हो जरा, राधाबाई. मी आत्तां देवापुढें तांदूळ ठेवून येतें. बरी

आपली सोबत होईल जातांना.' हें ऐकतांच सुमति म्हणाली, 'आई, तूं जा त्यांच्याबरोबर. मी आपली डोंगराच्या वाटेने येतें.' ओळखीच्या बाई सुमतीच्या लग्नाविषयी कांही तरी चौकशी करून तिचें मन फिरून दुखावतील अशी भीति राधाबाईंना वाटत होतीच. तेव्हा त्या सुमतीच्या इच्छेच्या आड आल्या नाहीत. तेथून सुमति जी निघाली ती डोंगराकडे न जातां नदीच्या वाटेला लागली. तिच्या मनांत काळेकुट्ट विचार थैमान घालीत होते. हळूहळू समोर स्मशान दिसूं लागलें. एकच चिता जळत होती. 'तें कुणाचें प्रेत जळत असेल ? बाईचें का बुवाचें ? बाई असली तर ती सुंदर असेल का ? आतां जळून गेल्या-वर तिची राख सुंदर दिसेल का ? रूपाला जगांत इतकी कां किंमत आहे ? एका भिकारड्या कारकुनाने सुद्धां माझा अव्हेर करावा ? पण मी तरी त्याला भिकारडा म्हणून कां हिणवावें ? त्याची पहिली बायको सुंदर असेल का ? ती मेली तशी मी कां मेलें नाही ?' मरण्याचा विचार मनांत येतांच ती जरा थांबली. 'मी जीव देऊं का ? जगून तरी लाथाच खायच्या की नाहीं ? मला सगळीं लाथा कां मारतात ? मी उलट लाथा झाडल्या तर ? मी कुरूप झालें हा माझा दोष आहे का ? मी काय पाप केलें होतें ? दोन बहिणींत इतका भेद काय म्हणून ? आई हा भेद मानीत नाहीं. आणि तारा ? तिला माझ्याविषयी प्रेम वाटतें. प्रेम नाही, दया, कींव वाटते. तीच माझ्या दुःखाचें मूळ आहे. तिच्यासाठी संस्थानिक लोटांगणें घालतील अं ? आणि मला ? कदा-चित् नोकरीलासुद्धां ठेवणार नाहीत. मीं जगाचें काय घोडें मारलें आहे ? लोक मला कां हिणवतात ? मीं त्यांच्यावर सूड उगवला तर ? पण कसा ? रूपाखेरीज जगांत कशाला किंमत आहे का ?...हो !...पैशाला आहे.' सुमति घरीं फिरली. घरीं येते तों रात्र झाली होती. तिच्या आईच्या मनांत नाहीं नाहीं ते विचार येत होते. तिला एकटीला आपण उगीच जाऊं दिली असें तिला वाटे. तारालाहि काळजी वाटत होती, पण अंधारांत बाहेर जाऊन तिचा तपास करण्याचें धैर्य मात्र तिच्यांत नव्हतें. अखेरीस पावलें वाजलीं. दारांतच तारा म्हणाली, 'किती ग उशीर केलास सुमति ?' आईहि स्वयंपाकघरांतून बाहेर आली.

'इतका उशीर नको बाई करीत जाऊं घरीं यायला. चोऱ्यामाऱ्या फार होऊं लागल्या आहेत हल्लीं. परवां तर पठाणांनी एका बाईला पळवून नेली म्हणून ऐकलं.' इतक्यांत वडिल खाली आले व म्हणतात, 'हिला हडळीला कोण बसला आहे पळवून न्यायला? नेली तर सुटेन तरी एकदांचा.' सुमतीनें वडिलांकडे पाहिलें. तिच्या डोळ्यांतून ठिणग्या बाहेर पडताहेत असा भास झाला.

'बाबा, माझ्या लग्नाची तुम्ही मुळींच काळजी करूं नका. माझं मी पाहून घेईन. तुम्ही आपली ताराची आणि संस्थानिकांची गाठ घालून द्या म्हणजे झालं.' सुमति एकएक शब्द अगदी मोजून उच्चारीत होती.

'नाहीतरी आतां त्याच विचाराला लागलं पाहिजे. कारण तूं पिवळी होईपर्यंत वाट पहायची, म्हणजे ताराचे केस पांढरे व्हायची वेळ यायची.'

'मला मुळी लग्नच करायचं नाही.'

'मग काय करणार आहेस? मास्तरकी?'

'नाहीं. तुम्ही माझ्यासाठी एक हजार रुपये हुंडा द्यायला तयार झालां होतांत ना?' सुमती अगदी शांतपणें आपला डाव मांडीत होती.

'बरं मग?'

'तेवढ्या पैशांत मला नर्सिंगचं शिक्षण पुरं करतां येईल. मास्तरणीपेक्षां नर्सला जास्त पैसे मिळतात. पुढेमागे मी तुमचे हजार रुपये सव्याज फेडीनसुद्धां.'

वडील विचार करीत वर गेले. ते रात्रीं जेवीत नसत. बायकांची जेवणें होऊन निजानीज झाली. सुमति व तारा माजघरांत निजत. तारा पलंगावर निजे, सुमतीला खाली निजायला अधिक आवडे. सुमति अंगावर दागिने घालीत नसे. ताराच्या हातांत मात्र बिलवर होते. कानांत कुडीं होतीं गळयांत बोरमाळ होती. सुमतीला गाढ झोंप लागली होती. इतक्यांत तिला कपड्याच्या सळसळण्याचा आवाज ऐकूं आला. लगेच कोणी गुदमरत कांही आवाज काढीत असल्याचा भास झाला. बाहेरील चांदण्याचा प्रकाश खिडकींतून आंत येत होता.

ती हलकेच उठून पाहते तों एक तोंड झांकलेला पटाण ताराच्या तोंडांत बोळा कोंबीत असल्याचें तिला दिसलें. दुसऱ्या एका इसमानें तिच्या हातांतल्या बांगड्या ओरबाडून काढल्या होत्या व गळ्यांतली माळहि लांबवली होती. आतां खिशांतून सुरा काढून तो ताराचे कान कापून कुडीं लांबवण्याच्या बेतांत होता, तोंच सुमतीने एक खुर्ची त्याच्या टाळक्यांत घातली. तो खाली पडला व हातांतील सुरा आणि दागिने गळून पडले. गडबड ऐकतांच पहिल्या इसमाने ताराला सोडली. त्याबरोबर ताराने सुमतीला तेथे एकटीच टाकून जी धूम टोकली, ती मोरींत जाऊन आंतून कडी लावून बसली. ताराला सोडल्यावर तो इसम सुरा उचलूं लागला तोंच सुमतीने टेबलावरचा दिवा त्याच्या हातावर मारला. दिवा फुटून कांचा चोराच्या हाताला लागून रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या. इतक्यांत वर आईवडिलांना चाहूल लागून तीं खाली येऊं लागलीं. चोरांनी लागलीच खिडकींतून पोबारा केला. सर्व हकीकत ऐकल्यावर व पाहिल्यावर सुमतीच्या पाठीवरून हात फिरवीत आई म्हणते, 'पाहिलंत ? सुमन नेहमी ताराला पाण्यांत पाहते म्हणून आपल्याला वाटत असे ना ! पण तिच्यावर प्रसंग गुदरला तेव्हा जिवावर सुद्धां उदार झाली की नाही ?' वडिलांनाहि तिच्या धिटाईचें कौतुक वाटलें. 'शाबास पोरी ! मुलगा असतीस तर सैन्यांत पाठवली असती. कुळाचं नांव काढलं असतंस. मुलीच्या जन्माला कशाला आलीस ?' शाबासकी, पण तीहि किती विषारी ? 'नर्स होऊन सुद्धां लढाईवर जातां येतं, बाबा.' सुमतीने उत्तर दिलें. (अपूर्ण)

---

## तैलयुक्त फळें

( फ्रेंचवरून )

काजू, भुईमूग, बदाम, पिस्ते यांची अन्नाच्या दृष्टीने गेल्या शतकांत फारशी किंमत समजत नसत, परंतु ती आतां सर्वांना समजूं लागली आहे.

इतकेंच नव्हे तर शाकाहारापैकी फक्त याच पदार्थांत अन्नांत जरूर असणारे जवळजवळ सर्व घटक सांपडतात. उदाहरणार्थ यांत प्रोटीनचें शेंकडा प्रमाण ' हॅझेल् नट् ' मधें ११ पासून भुईमुगांत २७ पर्यंत असतें, तेलाचें प्रमाण बदामांत ४१ पासून ' ब्रॅझिल् नट् ' मधें ६७ पर्यंत असतें, आणि कार्बोहायड्रेट्-चें प्रमाण ' ब्रॅझिल् नट् ' मधें ३.८ पासून भुईमुगांत १५.६ पर्यंत असतें. त्यांपासून कॅलोरी किती मिळतात हें पाहिलें तर बदामांत ४९२ पासून ब्रॅझिल-नट मधें ७०८ पर्यंत मिळतात. हे आंकडे ओल्या फळासंबंधीं आहेत. वाळलेलीं फळें घेतलीं तर हे आंकडे चतुर्थांशाने वाढवले पाहिजेत.

या फळांमुळे पोटांत वारा धरतो, तीं पचायला कठिण असतात, त्यांनी पोट दुखतें, तोंडांतील श्लेष्मल त्वचेचा दाह होतो, वगैरे अनेक तक्रारी ऐकूं येतात, परंतु त्याचें कारण असें की हीं फळें चांगलीं चावून खावीं लागतात. आणि कांहींचे दांत शावूत नसल्यामुळे किंवा निष्काळजीपणाने कांही लोक तीं चांगलीं चावल्याशिवाय खातात. ' विल्हेल्म् हाइप्क ' नांवाच्या मनुष्याने यासंबंधी प्रयोग करण्याकरतां म्हणून दोन सबंध दिवसपर्यंत फक्त ' हॅझेल् नट्,' ' ब्रॅझिल् नट् ' आणि भुइमूग यांवर काढले, आणि यांशिवाय फक्त दोन पेले काफी व तीन चार तुकडे साखर, यापेक्षा कांहीही खाल्लें नाही, आणि या सर्व तक्रारी त्याने खोट्या ठरवल्या. आतां हें खरें की अख्खे बदाम खावून जर वरील प्रकारचा त्रास कोणास होत असेल तर त्याने त्यांची पूड करून खावी. बदाम दळण्याकरतां एक यंत्र थोडक्यांत मिळतें, त्याने त्यांची सहज पूड करतां येते. तेव्हा ज्यांचे दांत शावूत नसतील त्यांनीही हीं फळें खाण्यास हरकत नाही. तेव्हा बदाम, हॅझेल् नट्, अक्रोड, काजू, ब्रॅझिल् नट्, युरोपांतील पाइन् व बीच् आणि चीनमधील जिंको यांचीं फळें, भुइमूग व नारळ, हीं फळें अतिशय पौष्टिक आहेत आणि त्यांपुढे मांसाची देखील फारशी किंमत नाही असें म्हणण्यास हरकत नाही. मात्र तीं जेवणांतील महत्वाचे पदार्थ समजून खाल्लीं पाहिजेत, पोटभर जेवल्यावर करमणूक म्हणून तीं थोडीबहुत खाण्याने काम होत नाही.

चविष्ट पदार्थ तयार करण्यास देखील या फळांचा अतिशय उपयोग होतो, आणि मांसाहारी लोकांना देखील तीं आवडतात. उदाहरणार्थ 'सँडविच्' तयार करण्याकरतां पुढील मिश्रण वापरून पहावें ('सँडविच्' म्हणजे पावाच्या दोन तुकड्यांच्या मधें कांहीतरी पूरण घालून नंतर त्याचे तुकडे—बहुधा तिकोनी—पाडतात) १५० ग्रॅम् काजू, १०० ग्रॅम् पाइनचीं फळें, ५० ग्रॅम् पिस्ते, यांचीं सालें काढून पूड करावी व नंतर त्यांत ५ ग्रॅम् ऑलिव्ह ऑइल्, ५ ते १० ग्रॅम मोहरीची पूड, थोडी मिरपूड आणि ओव्याचीं ताजीं पानें बारीक कापून घालावीं. नंतर हें मिश्रण एकजीव करून पावांत घालावें. (प्रेस मेडिकॅल, आंरी लक्लेर.) हिंदुस्थानांत पाइनचीं फळें मिळणार नाहीत, त्यांऐवजी भुइमूग, आणि ज्यांना पिस्ते परवडणार नाहीत त्यांनी बदाम घालण्यास हरकत नाहीं. **सं.**

---

# वैद्यकी व्यवसायांतील अनुभव


लेखक, "मी"

वसंतराव नुकतेच बी. ए. झाले होते. घरचे इनामदार असल्यामुळे त्यांच्या विवाहाबद्दल आतां जारीने खटपट चालू होती. आईवडिलांनी एक सुस्वरूप मॅट्रिक झालेली मुलगी पाहून वसंतरावांची पसंती विचारली. वसंतरावांनी मुलगी पसंत केली, पण एक चमत्कारिक अट घातली. ती अशी की मी आतां इंग्लंडला जाऊन चार वर्षांत एम्. ए., पीएच्. डी. होऊन येईन तोंपर्यंत माझ्या पत्नीने एम्. बी. बी. एस्. च्या अभ्यासास लागावें. निदान एल्. सी. पी. एस्. तरी झालेंच पाहिजे. वासंतीबाईनेहि शिकण्याचें हौसेने कबूल केलें. मुलीचे वडील मनोहरपंत चिकटे हेहि चांगले गर्भश्रीमंत होते. लग्न ठरलें, रु. ५००० हुंडा, मानपान, सर्व कांही वसंतरावांच्या आईच्या मनाप्रमाणे ठरलें.

लग्नाच्या वेळीं ५००० रु. हुंडा देतांना मनोहरपंतांचें तोंड जरा आंबट झालेलें दिसलें. आईसाहेबांस ऐकून माहीतच होतें की हे लोक नांवाप्रमाणेच चिक्कू आहेत. त्या माउलीने त्या सर्व नोटा जशाच्या तशा परत त्यांच्या हातीं देऊन सांगितलें की आम्हाला आपली मुलगी पाहिजे आहे, पैशांचा कांही तसा प्रश्न नाही. आपली मुलगी आमचे येथे चांगली नांदली की आम्हांस आनंद आहे. तुमचे पांचदहा हजार घेऊन काय आमच्या जन्माला पुरणार आहेत? मनोहरपंतांनी शिष्टाचार म्हणूनहि ते परत देऊं न करतां रक्कम खिशांत घातली व त्यांच्या तोंडावर हास्य चमकलेलें चार लोकांनी पाहिलें.

विवाह सुरळीतपणें पार पडून लवकरच वसंतराव विलायतेस गेले व वासंतीबाई मुंबईच्या मेडिकल कॉलजांत शिरल्या. वसंतरावांच्या वडिलांनी आईसाहेबांच्या सांगण्यावरून मुलीला अभ्यासाच्या सोयीसाठी मुलींच्या वसतिगृहांत ठेवलें व तेथे मुलीला पैशाची कमतरता कधीच पडूं नये अशी सोय केली, कारण आईसाहेबांचें प्रेमच इतकें विलक्षण होतें व सूनबाईहि त्यांस फार आवडत. फर्स्ट एल्. सी. पी. एस्. च्या परीक्षेच्या वेळीं सर्वांस प्रॅक्टिकलसाठी ग्रँट मेडिकल कॉलेजांत यावें लागतें. तेथे वासंतीच्या पूर्वीच्या ओळखीचा (शाळेंत जरा पुढे असलेला) विद्यार्थी 'रामभाऊ' एम्. बी. बी. एस्. चा अभ्यास करीत होता, त्याची गांठ पडली. तेथे साहजिकच एकंदर विचारपूस झाली, पूर्वीची ओळख दृढ झाली. वासंतीच्या पुढील अभ्यासास एक नवीन जोडीदार मिळाला. हळूहळू रोज एकमेकांस भेटण्याचें आकर्षण टाळणें अशक्य होऊं लागलें. मधूनमधून दोघांनी सिनेमाला जाणें व एकांतगोष्टीहि होऊं लागल्या. हॉस्टेलच्या मेट्रनने कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला. पण काय? 'हें बंधुभगिनीचें प्रेम आहे, वावगी गोष्ट मी कशी करीन?' प्रेमळ सासूसहि हेंच उत्तर. असे दिवस जातां जातां वसंतराव विलायतेहून परत येण्याची वेळ आली. त्या सुमारास रामभाऊ एम्. बी. बी. एस्. पास झाले व विलायतेस जाण्यास निघाले व वासंतीहि परीक्षा पास होऊन डॉक्टर बनली. वसंतरावांच्या मातोश्रींनी डाक्टरीणबाईंस मुंबईंत हॉस्पिटल काढून दिलें व वासंतीबाई उद्यो-





गास लागल्या. डॉ. रामभाऊंनी जातांजातां वासंतीकडून एक गोष्ट मागितली, ती ही की मी परत येईपर्यंत तूं आपल्या नवऱ्याशीं संबंध करूं नये. शिवाय आपल्या मित्रमंडळींत असें दाट पसरवलें की वसंतराव नपुंसक आहेत, अशा रत्नाशीं लग्न लावून पोरीचें मात्र पाप !

वसंतराव एम्. ए , पीएच्. डी. ( लंडन ) होऊन आले. आल्याबरोबर येथील कालेजमधें प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली, सर्व ठीक झालें. पण स्वारीला घरीं सुख लगेना व कालेजांत व क्लबांत आपल्याबद्दल कुजबुज चालते असें समजलें व एकंदर बातम्या ऐकून तर वसंतराव सर्दच झाले. स्वतः स्वभावाने अतिशय थंड, पण आतां त्यांना राहवेना. बायको आपणास जवळ येऊं देत नाही, तरी याच्या मुळाशीं कांहीतरी असलें पाहिजे, म्हणून आज पूर्ण शहानिशा करून घेण्याचें ठरवलें. रात्रौ जेवणें वगैरे आटोपल्यावर वासंतीबाईस ' मला तुमच्याजवळ कांही महत्वाच्या गोष्टी बोलायच्या आहेत' असें सांगितलें. रात्रौ काय गोष्टी झाल्या, याची कल्पना वसंतरावास चावल्यामुळे झालेल्या करंगळीच्या जखमेवरून घरच्या मंडळींस आली. बाईनें वसंतरावाशीं संबंध करण्याचें नाकारलें. कां, तर ' मला असल्या घाणेरड्या गोष्टी आवडत नाहींत. ' तेव्हापासून पुनः बरेच दिवस असेच गेले. या दिवसांत सासूबाईंनी वासंतीबाईस पुष्कळ समजावण्याचा प्रयत्न केला, त्याला यश आलें, व पुनः प्रेमाचा सांधा जमेल अशी घरच्या मंडळीस आशा वाटते तोंच वासंतीबाईंनी सांगायला सुरवात केली की ' हे नपुंसक आहेत, मला यांच्या गळ्यांत कशाला बांधली ? ' वगैरे.

वस्तुतः वसंतराव अतिशय सौम्य स्वभावाचे होते व त्यांना समागमाची भूकहि कांही तीव्र नसे, पण त्यांच्या या थंड स्वभावामुळेच इतरांस असें वाटू लागलें की हे खरोखरच नपुंसक असावे. एकंदर आरोप ऐकूनहि कांही चीड यावी, तर तेंहि नाही. ' अहो वसंतराव, औषधपाणी तरी करून घ्या ' असें कोणी घरीं किंवा क्लबांत म्हणालें, तर वसंतराव म्हणत ' मला कांहीएक झालेलें नाहीं. मला औषधपाण्याची गरज भासत नाही. '

इनामदारांचे वसंतराव एकुलते एक चिरंजीव आणि त्यांची अशी परिस्थिती! आपला वंश खुंटणार की काय या भीतीने वसंतरावांनी कोणा मोठ्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असें साहजिकच आईसाहेबांस व वडिलांस वाटे. नाही होय करतां करतां मुंबईतील एका सुप्रसिद्ध पारशी फिझिशिअनला वसंतरावांस दाखवण्यास नेलें. डाक्टरसाहेबांनी तपासलें, 'प्रोस्टेट् मॅसाज्' देऊन मिळालेल्या वीर्याची सूक्ष्मदर्शक यंत्राने तपासणी केली आणि वसंतराव नपुंसक आहेत किंवा कसे, या प्रश्नाचें उत्तर डॉक्टरमजकुरांनी असें दिलें की वीर्यांत जंतु कमी दिसतात! हा निकाल ऐकून एकदर मंडळींस धास्तीच बसली.

आतां यासाठी कांहीतरी इलाज केले पाहिजेत, कांही इंजेक्शनें घ्यावीं काय, वगैरे भवति न भवति बरेच दिवस चालू होती, कारण वसंतराव म्हणत मला कांहीच झालेलें नाही, मला औषधें घेण्याची गरज नाही. असे कांही दिवस गेल्यावर कोणा तज्ञ डॉक्टरांला भेटावें म्हणून एका सेक्सॉलजिस्टकडे वसंतरावांस नेलें. या डॉक्टराने वसंतरावांची सर्व माहिती घेऊन तपासणीहि संपूर्ण केली. डॉक्टरांच्या तपासणींत त्यांना रोग्याची उत्थापनशक्तिहि पहावयास मिळाली व डॉक्टरांचें समाधान झालेंसें दिसलें. एकंदर चौकशींत पहिल्या डॉक्टरने दिलेला वीर्याचा रिपोर्टहि डॉक्टरांना दाखवला गेला. या तज्ञ डॉक्टरने असें मत दिलें की वीर्यांत शुक्रजंतु किती आहेत किंवा नाहीत, यावरून फक्त मुलें होतील किंवा नाही एवढाच संभव सांगतां येईल. वीर्यांत शुक्रजंतु नसतांनाहि मनुष्य नीट प्रकारें संभोग करूं शकेल, तसेंच याउलट वीर्यांत शुक्रजंतु भरपूर असूनहि मनुष्य नपुंसक असूं शकेल. थोडक्यांत वीर्यांतील जंतूंचा पुरुषाच्या समागमशक्तीशीं फारसा संबंध नाही. याशिवाय वसंतरावांस डॉक्टरने सर्टिफिकीट लिहून दिलें की 'उचित प्रसंगीं' वसंतरावांस समागम करण्यास कांही अडचण दिसत नाही.

एकंदरींत या डॉक्टरने दिलेला निकाल ऐकून या मंडळींस आश्चर्यच वाटलें. या डॉक्टरने आमच्या एम्. डी. (लंडन) डॉक्टरचा निकाल फिरवला!

पण अनुकूल निकाल असल्यामुळे म्हणा किंवा कांही म्हणा, एक प्रकारें बरेंच वाटलें. घरच्या मंडळींसाहे पटलें की वसंतरावांची बाजू खरी आहे. पण एक रुखरुख कायमच होती की या इतक्या तरुण वयांत हा गृहस्थ इतका थंडा कां ? शिवाय वासंतीबाईंनी सांगितलेली गोष्ट खोटी की काय ? हा जाबहि बाईस विचारण्यांत आला, पण थोडक्यांत निष्कर्ष एवढाच निघाला की बाई पटवून घेण्यास तयार नाहीत. बाईंच्या वडिलांस इतके दिवस झालेल्या प्रकारांत कांही गैर दिसलें नाहीं, पण या सेक्सॉलजिस्ट डॉक्टरचा निकाल कांही रुचेना. म्हणून मनोहरपंत मुंबईस येऊन मुद्दाम डॉक्टरांस भेटले. तेथे झालेला गमतीचा संवाद पुढीलप्रमाणें:—

**मनोहरपंतः**- डॉक्टरसाहेब, वसंतरावांच्या केसबद्दल मी आपणास भेटण्यास आलों आहे. आपण त्यांना लिहून दिलेंत की ते नपुंसक नाहीत. पण त्यांची स्वतःची पत्नी तर ते समागम करूं शकत नाहीत असें म्हणते. शिवाय ती स्वतः डॉक्टर आहे, तरी आपण असा कसा निकाल दिलात ?

**तज्ञः**—पंत, आपण माझ्यापाशीं परस्पर तिऱ्हाइताबद्दल माहिती विचारतां, पण मी आमच्या वैद्यकी शिष्टाचाराप्रमाणे आपणांस कांहीच सांगू शकत नाही या बाबतींत. माझ्याकडे आलेल्या कोणाहि रोग्याची माहिती कोणासहि न सांगण्याबद्दल मी कायद्याने बांधलेला आहें. याकरतां आपण म्हणतां त्या गृहस्थांना येथे घेऊन या, नंतर त्यांच्या संमतीनेच फक्त मी आपणांस काय तें सांगू शकेन.

**पंतः**—अहो ते प्रथम आले तेव्हा मी त्यांच्या बरोबरच येणार होतों. शिवाय मी आपली फी देण्यास तयार आहें.

**तज्ञः**—आपण त्यांच्या बरोबर न आल्यामुळे मी आपणांस याबाबत कांही सांगू शकत नाही, याबद्दल मी अत्यंत दिलगीर आहें. आपण फी देण्यास तयार असाल, पण आतां आपण मागत असलेली माहिती कितीहि किंमत देऊन विकत घेतां येण्याजोगी नाही. तेव्हा आपण माझा वेळ विनाकारण मोडूं नये.

**पंत**:—आपण जें सर्टिफिकीट लिहून दिलें आहे, त्यांत आपण लिहिलें आहे ' उचित प्रसंगीं. ' त्याचा अर्थ काय ? म्हणजे इतर सर्व वेळां ते नपुंसक आहेत, असाच की नाही ?

**तज्ञ**:—अनुचित प्रसंगीं आपणहि नपुंसक ठराल. आपणांस न आवडणाऱ्या स्त्रीशीं, तोंड चांगलें दिसत असूनहि रोगाने भरलेल्या स्त्रीशीं, आपणांस कसें वाटेल ? समजा आपण आपल्या स्त्रीवर भयंकर रागावलेले आहांत, आपला तिने भयंकर अपमान केला आहे, तिच्याकडून आपणांस कोणत्याहि प्रकारें समागमास उत्तेजन तर राहोच, पण जर अडथळाच असेल, तर तें सुख आपणांस कितीसें रुचेल ? ज्याला कांही भावना आहेत, त्याच्या भावना दुखावल्या गेल्यास त्याला नपुंसकत्व परवडेल, पाशवी वृत्तीचा मनुष्यच अशा वेळीं फार तर निराळा दिसेल. पंत, आपला चोरटा संभोग उघडकीस येईल, किंवा एवढ्यांत कोणी आलें तर कसें, एवढ्याच विचाराने निकोप पुरुषालाहि तात्पुरतें नपुंसकत्व आल्याचें आम्हास माहीत आहे. माझ्या दोन शब्दांत एवढा अर्थ भरला आहे.

पंतांचें समाधान झालें नाही, आणि डॉक्टरांचा अर्धा तास मोडूनहि पंतांनी डॉक्टरांची फी दिली नाही, हें पंतांच्या स्वभावास योग्यच होतें. असो. वसंतरावांच्या मातोश्री म्हणूं लागल्या, ' बाबा वसंत, तूं आपला दुसरें लग्न करसा. या परिस्थितींत एक बायको जिवंत असतांना दुसरी केली तरी दोन बायकांचा दादला म्हणून तुझी नाचक्की होणार नाही. या विषयावर तूं एक लेख लिहून वर्तमानपत्रांत छापण्यास दे. तुला दुसरें लग्न करण्याचा राजरोस हक्क कोणीहि सुज्ञ मनुष्य देईल. '

आश्चर्याची गोष्ट अशी की ज्या डॉक्टर महाशयांनी या संसारांत बिब्बा घातला, तेहि कांही दिवसांनी मुद्दाम वरील तज्ञ डॉक्टरांकडे गेले. त्यांनी सुज्ञपणें बाईचा नाद सोडण्याचें व तिला समजावण्याचें कबूल केलें. पुढें काय झालें कोण जाणे. पण लवकरच या डॉक्टरसाहेबांचें एका चुणचुणीत स्त्रीशीं लग्न झाल्याचें समजलें. पण वसंतरावांची निरगांठ अद्याप सुटली की नाही हें समजलें नाहीं.

# प्रेतचौर्य

फ्रेंच वरून

पुरलेलीं प्रेतें चोरून नेण्याचा धंदा किती जुना आहे हे नक्की सांगतां येणार नाही, तथापि प्रेतें फाडून शारीरशास्त्राचा अभ्यास करण्यास सुरवात झाली तेव्हाच हा उत्पन्न झाला असावा, कारण प्रेतें मिळण्यास नेहमी पंचाईत पडे. चौदाव्या शतकांत मॉपेलिए ( या फ्रेंच शहरांत एक युनिव्हर्सिटी आहे. **संपादक.** ) येथील वैद्यकशाळेंत दर वर्षी फक्त एक प्रेत फाडण्याचा हुकूम होता आणि हें प्रेत एखाद्या मृत्युदंड झालेल्या पुरुषाचें किंवा स्त्रीचें असे. नंतर १६६० सालीं दोन प्रेतें दरवर्षी फाडण्याची परवानगी मिळाली आणि शारीरशास्त्र हा विषय अभ्यासक्रमांत शिरला. प्रेत आलें की तें शस्त्रवैद्यांकडून फाडवींत असत आणि इतर शिष्ट डाक्तर त्याला कधी हात देखील लावीत नसत. डाक्तराने स्वतःच एखाद्या विद्यार्थ्याला घेऊन एखाद्या फांशी दिलेल्या माणसाचें प्रेत फांसावरून सोडवून आणावें, अशा गोष्टी सोळाव्या शतकांत घडलेल्या आहेत. सतराव्या शतकांत मात्र प्रेतें उघडपणें फाडूं लागले, आणि मोलिअरनें आपल्या नाटकांत एक डाक्तर आपल्या प्रेमपात्राला प्रेत फाडतांना पहायला बोलावतो असें दाखवलें आहे.

इंग्लंड्, स्कॉटलंड्, आयर्लंड् या देशांत मात्र अजून हें इतक्या उघडपणें होत नसे, आणि यामुळे प्रेतचौर्याच्या धंद्याची भरभराट होती. आठवा हेनरी गादीवर आल्यावर त्याने वर्षातून चार प्रेतें फाडण्याची परवानगी दिली, परंतु तीं उघडपणें सर्वांसमक्ष फाडलीं पाहिजेत असें फर्मावलें, आणि यामुळे लोकांची गर्दी जमून मारामाऱ्या देखील होत. यामुळे प्रेतावर कोणत्याही प्रकारचे प्रयोग करतां येत नसत. एकोणिसाव्या शतकांत शस्त्रवैद्यांना आणखी कांही सवलती मिळाव्या म्हणून जिकडून तिकडून

तक्रारी चालू होत्या. तथापि याबद्दल १८३२ पर्यंत कोणताही कायदा झाला नाहीं, पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं कायदा, धर्म, लोकमत हीं सर्व विरुद्ध असतांना देखील शारीरशास्त्राची एकसारखी प्रगति होत होती, विद्यार्थ्यांची गर्दी होत असे, आणि प्रेतें कमी पडत नसत. मग हीं प्रेतें कोठून येत ? तीं चौर्याच्या मदतीने मिळत. या धंद्यांत सर्व धंदेवाईक चोरच होते असें नाहीं. प्रोफेसरांवर खुष असलेले विद्यार्थी ज्ञानलालसेने कधीकधी स्वतःच थडगीं उकरून प्रेतें आणण्याचा उद्योग करीत. श्रीमंत लोक चोरांविरुद्ध शक्य ते उपाय करीत आणि रखवालीकरतां ठेवलेले लोक कधीकधी त्यांचेवर गोळ्याही झाडीत.

परंतु हा धंदा करण्याकरतां एक चोरांची कंपनीच निघाली, आणि त्यांचे-वरच मुख्य भिस्त ठेवावी लागे. त्यांनी प्रेतांच्या किंमतीही ठरवल्या पुरी वाढ झालेल्या माणसाच्या प्रेताला चार गिनी पडत, आणि लहान मुलांना किंवा गर्भांना त्या मानाने कमी. आणि या चोरांना एवढेच पैसे मिळत असें नाही. प्रेतावर जें जें सांपडेल तें त्यांचेंच आणि शिवाय प्रेताचे दांतही विकत घेणारे लोक होते. पुढे पुढे हे लोक प्रोफेसरांना फारच त्रास देऊं लागले, तेव्हा प्रोफे-सरांनीही संगनमत करून त्यांना द्यायच्या किंमती ठरवून टाकल्या. याशिवाय चोरांची अशीही एक शर्त असे की त्यांपैकी एखादा पकडला जाऊन त्याला तुरुंगांत जावें लागल्यास त्याच्या कुटुंबास या प्रोफेसरांनी पोसलें पाहिजे. या चोरांना कांही कमी धोका नसे. त्यांना बरोबर पावडीं, खोरीं वगैरे हत्यारें आणि पोतीं, आणि शिवाय वेळ पडल्यास पळून जाण्याकरतां एक गार्डीही बरोबर ठेवावी लागत असे. एकदां एकच प्रेत दोन प्रोफेसरांना पाहिजे होतें, कारण त्यांत कांही विशेष पाहण्यासारख्या बाबी होत्या. हें मृता-च्या नात्याच्या माणसांना माहीत होतें आणि त्यांनी तें प्रेत पुरलेल्या ठिकाणीं पहारा ठेवण्याची व्यवस्था केलेली होती. परंतु पहारेकरी येण्यापूर्वी, थोडाबहुत अंधार पडल्यावर, त्या लहानशा गांवांतल्या उपहारगृहाशीं एक गाडी आली, त्यांतून दोन मनुष्य उतरले आणि दुकानदाराला सांगून गेले की एक मनुष्य एक पोतें गाडींत आणून टाकील. कांही वेळाने त्यांतल्याच एका माणसाने हमा-

लाच्या वेशांत एक पोतें आणलें. तें प्रेत त्यांनी अर्ध्या तासाचे आंत उकरून आणलें होतें.

अशा लोकांपासून संरक्षण कसें करावें ? कांही लोक सभोंवतीं बंदुका लावून त्यांना तारा बांधून तेथे कोणी आल्यास त्या उडाव्या अशी व्यवस्था करीत. अशा वेळीं काळा पोशाख केलेली एखादी स्त्री त्या थडग्यावर फुलें घालतांना दिसली, तर तिच्यावर अर्थात्च कोणी फारसें लक्ष ठेवीत नसे. पण ही चोरांचीच साथीदार असून तारा कापून चोरांना निर्भय करण्यांत गुंतलेली असे. पण कोणी म्हणेल कबरस्थानांत रखवालदार असतात, ते काय करीत असत ? एकतर ते झोंपीं जात किंवा लांच घेऊन चोरांना मदत करीत. कदाचित् एखादा पैसे न घेणारा भेटलाच, तर तो दारूच्या बाटलीने वश होत असे. हे चोर आपलें काम इतकें झपाट्याने करीत की त्यांपैकी एकाने चार रात्रींत ३३ प्रेतें उकरल्याची घमेंड मारली आहे. तो बहुधा गरिबांचींच प्रेतें उकरीत असे, कारण तीं जवळजवळ पुरलीं असल्यामुळे एकदम तीनचार प्रेतें देखील सांपडायचीं ! हे लोक बहुधा प्रेताच्या वरची जागा उकरीत नसत. ते पायांच्या बाजूला एक खड्डा खणीत, तो पावड्याने रुंद करीत, आणि मग एक आंकडा आंत घालून प्रेत ओढून घेत. अर्थात् ते ती जागा शक्य तों मूळच्यासारखी दिसेल अशी भरून ठेवीत, आणि पुष्कळ वेळां कोणाला प्रेत काढल्याची शंका देखील येत नसे.

यांच्या विरुद्ध प्रयत्न करणाऱ्याही कांही कंपन्या निघाल्या. कोणी आसपासचे सर्व लोक जागे होतील अशा घंटा लावण्याची युक्ति काढली, कोणी किंचित् धक्का लागल्याबरोबर बंदुका उडतील अशी व्यवस्था केली. १८२२ सालीं अनेक सर्टीफिकिटांसह एका सुरक्षित प्रेतपेटीची जाहिरात ' वूलर्स ब्रिटिश गॅझेट ' मधें प्रसिद्ध झाली होती. याच वेळच्या एका स्कॉच् पत्रांत पुढील बातमी सांपडतेः–' गेल्या सोमवारीं डंडी येथे एका लहान मुलाचें प्रेत पुरण्याचा समारंभ पाहण्याकरतां खूप गर्दी जमली होती, कारण त्याच्या बापाने प्रेतचौर्या-

विरुद्ध कांही नवीन युक्त्या योजल्या होत्या. प्रेतपेटीच्या चारी कोंपऱ्यांना जोड-लेलीं कांही प्राणघातक हत्यारें तर होतींच, पण याशिवाय सभोंवतीं एक स्फोटक पूड मुबलक टाकली होती. कोणी हें प्रेत चोरण्याचा प्रयत्न केल्यास ताबडतोब स्फोट होईल अशी सर्वांची खात्री झाली.'

कधीकधी कब्रस्थानापर्यंत जाण्याचा प्रयत्न न करतां हे चोर जेथे आत्महत्त्या केलेल्या किंवा अपघाताने मेलेल्या लोकांचीं प्रेतें ठेवलेलीं असत, तेथूनच तीं चोरून नेत. कधी असेंही होई की असें एखादें प्रेत चोरून नेऊन तें एखाद्या डाक्तराला विकल्यावर तें आपल्याच एका नातेवाईकाचें प्रेत असून तें चोरीस गेल्याबद्दल तेच पोलिसाकडे तक्रार करीत आणि तें अमुक ठिकाणीं सांपडेल अशीही माहिती देत, आणि तें पोलिसाकडून परत मिळवीत आणि पुनः तेंच कोणाला तरी विकीत. यांची मजल इतकीही जात असे की मारेकऱ्याकडून ते कोणाला तरी मारवीत आणि तें प्रेत विकीत. स्टीव्हनसन्, स्कॉट्, डिकन्स् वगैरे तत्कालीन कादंबरीकारांनी अशा गोष्टींचा उपयोग केलेला आहे.

या सर्व प्रकाराने लोकमत डाक्तरांविरुद्ध बरेंच खवळलें आणि एकदां डॉ. नॉक्स यांना लष्करी पोषाख घालून आपल्या एका मित्राकडे लपून राहावें लागलें. डॉ. मनरो यांच्या घरावर एकदां हल्ला करून लोकांनी त्याला आग लावली आणि मनरो यांना खिडकींतून पळून जावें लागलें. डाक्तरांचा पाठिंबा असल्यामुळे हे चोर क्वचितच सांपडत आणि कायद्याने तिकडे दुर्लक्ष केल्यामुळे लोक चवताळून घरें पाडीत, किंवा आग लावीत.

यांपैकी बेन् क्राउच् नांवाच्या एका चोराने बरेंच पैसे मिळवले आणि तो स्वतः धंदा करीत नाहीसा झाला. तरी तो इतरांकडून मृतांचे दांत मिळवून विकीत असे. तो व त्याचा एक मित्र जॅक हॉर्नेट् या दोघांनी मिळून सैन्याला लढाईच्या ठिकाणीं अन्न वगैरे पुरवण्याची परवानगी मिळवली. अर्थात् लढाई होईल तेथे जाऊन मरणोन्मुख लोकांच्या तोंडांत पाणी घालण्याऐवजी ते तेथून सांपडेल तितकी लूट आणीत असत. आणि शिपायांचे कपडे, दागिने वगैरे तर आणीतच, पण शिवाय त्यांचे दांत पाडून आणून विकीत.

क्राउच हा हे धंदे करून १८१७ पर्यंत गबर झाला आणि नंतर त्याने प्रवाशांकरतां एक मोठें घर बांधलें. तो स्वतः उत्तम, मूल्यवान पोषाख करीत असे आणि हातांत आंगठ्या मुबलक घालीत असे. पण त्याला आपल्या संपत्तीचा उगम लपवतां आला नाहीं, आणि तो कळल्याबरोबर प्रवासी त्याच्या घरांतून निघून जात. शेवटीं त्याची सर्व संपत्ति नाहींशी होऊन तो गरिबींत मेला.

---

# स्तनांच्या वाढीकरतां उपचार

‘ प्रेस मेडिकॅल ’ वरून

पुष्कळ स्त्रियांचे स्तन आकाराने अत्यंत लहान असतात व कांहींना जवळजवळ मुळींच नसतात, व हा केवळ सौंदर्याचाच प्रश्न नसून एकंदर प्रकृतीचा असतो, कारण स्तनांच्या आकाराबरोबरच त्यांचा गर्भाशय, जननेंद्रिय वगैरे भागहि सुस्थितींत नसतात. यावर चांगलासा उपाय आजपर्यंत माहीत नव्हता. परंतु स्त्रीबीजकोशांचा जो ‘ फॉलिक्युलीन् ’ नांवाचा अंतःस्राव असतो त्याचा उपयोग व्हावा अशा कल्पनेने या स्रावाच्या टोंचीं देण्याचे प्रयोग कांही डाक्तरांनी केलेले होते. परंतु त्यापेक्षा चांगला उपाय डॉ. सी. मॅक ब्राइड् यांनी ‘ जर्नल् ऑफ् दि अमेरिकन् मेडिकल् असोसिएशन्’च्या गेल्या १८ मार्चच्या अंकांत प्रसिद्ध केला आहे.

सामान्यतः कोणत्याहि औषधाचा लवकर परिणाम होण्यास टोंचींचाच अधिक उपयोग होतो असा अनुभव येतो, परंतु या बाबतींत फॉलिक्युलीनच्या टोंचीं देण्याऐवजी त्याच अंतःस्रावाचें एक मलम तयार करून तें स्तनांवर चोळल्यानें अधिक उपयोग होतो असें आढळलें. एका ग्रॅममध्यें आंतरराष्ट्रीय मापाने ५००० मापें फॉलिक्युलीन् अशा प्रमाणाचें मलम या डाक्तरांनी तयार केलें, आणि असें पांच ग्रॅम मलम घेऊन त्याने प्रत्येक स्तनावर निजण्यापूर्वी पांच मिनिटें मर्दन करावें असा उपदेश अशा कांहीं स्त्रियांस दिला. तें मलम रात्रभर

तसेंच राहूं दिलें व कांही दिवसांत स्तनांचा आकार बराच वाढलेला दिसला. कांही प्रयोगांत असेंहि केलें की हा केवळ मर्दनाचाच परिणाम होतो की काय हें पाहण्याकरतां एका स्तनावर औषधी मलम व दुसऱ्यावर औषध न घातलेलें मलम लावलें व फरक पाहिला, तेव्हा औषधी मलम लावलेल्या स्तनाची वाढ बरीच जास्त झालेली आढळली. दुसऱ्याचीहि थोडी वाढ झालेली दिसली, पण तीहि केवळ मर्दनाने असें म्हणतां येत नाही, कारण तें औषध एकंदर शरीरांतच भिनून त्याचा परिणाम योनिमार्गांतील श्लेष्मल त्वचेवर व गर्भाशयाच्या आकारावरहि झालेला दिसला, तसाच तो दुसऱ्या स्तनावरहि झाला असला पाहिजे. एकंदरींत लैंगिक कमतरतेचीं सर्व चिन्हें या उपचाराने कमी झालीं. शुद्ध फॉलिक्युलीन ऐवजी 'डायहायड्रोफॉलिक्युलीन' चें मलम केल्यास जास्त परिणाम होतो असें आढळलें.

एका स्त्रीला मासिक स्राव मुळीच होत नसे, तोहि या उपचाराने होऊं लागला. तिच्या जननेंद्रियाची व गर्भाशयाची वाढच झालेली नव्हती व गर्भाशय हाताला लागतच नव्हता. या सर्व भागांची वाढ वरील उपायाने झाली. या उपायांत एकच अडचण आहे की मलम लावणें बंद केल्यावर कांही दिवसांत स्तनांचा आकार पुनः कमी होतो. यामुळे हा उपाय कांही दिवसांच्या अंतराने पुनः पुन. करावा लागतो. असें केल्यापासून कांही नुकसान होतें की काय हें अजून समजलेलें नाही. अर्थात् हें औषध बरेंच महाग असतें, तेव्हा श्रीमंतांनाच त्याचा उपयोग होईल.

# स्पेनच्या युद्धांतील गोष्टी

( जेम् ब्रॅझिल् यांच्या फ्रेंचवरून )

जुन्या काळीं यूरोपांत अशी रीत होती की घराचा मालक घरीं नसतांना देखील एखादा वीर पाहुणा आला तर तो मालकिणीच्या शेजारीं, तिच्याच

बिछान्यावर निजायचा, पण दोघांच्या मधें त्याने आपली नागवी तलवार ठेवायची. याला त्या काळीं 'शिव्हलरी' म्हणत असत. हल्ली स्त्रियांवरचा मालकी हक्क नाहीसा होऊं पहात आहे, पण त्याचबरोबर एक नवीन प्रकारची 'शिव्हलरी' जन्मास येत आहे. स्त्री स्वतंत्र झाल्यामुळे ती स्वतः आपल्या शरीराची मालकीण झाली आहे. तिची मर्जी असेल तर ती तेंही देईल, पण तें न दिलें तरीही ती बहुधा सौजन्याने आणि प्रेमाने वागेल, आणि तिला इतका आत्मविश्वास आला आहे की ती पुरुषाच्या शेजारीं बिनदिक्कत निजेल. कारण तिच्या स्वातंत्र्याची अदृश्य तलवार मधें असल्यामुळे तिच्यावर हात टाकण्याची पुरुषाची छाती होत नाही.

उदाहरणार्थ स्पेनच्या लोकशाही सरकारच्या बाजूने लढण्याकरतां एक पोर्तुगीज डाक्टर स्पेनमधें जात होता. त्याच्याच बरोबर एक नार्वेजिअन तरुणी स्पेनमधें लढत असलेल्या आपल्या जर्मन प्रियकराकडे जायला निघाली होती. तेवढ्याकरतां ती नर्सचें काम शिकली होती. या दोघांची आगगाडींत ओळख झाली, आणि जन्मभाषा वेगळ्या पडल्यामुळे तीं एकमेकांशीं मोडके तोडकें इंग्रजी बोलत होतीं. स्पेनच्या हद्दीवरच्या एका लहानशा शहरांत त्यांना पुढील आगगाडीची वाट पहात एक दिवस व रात्र थांबावें लागलें. तीं हॉटेलांत गेलीं, तेथे एकच खोली शिल्लक होती आणि तींत एकच बिछाना होता. त्यांना नवराबायको समजून मालकाने त्यांना ती खोली दिली. पुष्कळ प्रवाश्यांना बाहेर उघड्यावरच निजावें लागलें. आपण नवराबायको नाही असें मालकाला सांगावें, तर आपलीही तीच स्थिति होऊन रात्रभर झोप यायची नाही. तेव्हां त्यांनीं ती खोली तर घेतली. डाक्टराने असा बेत केला की ती जागी असेल तोंपर्यंत आपण पडून रहावें, आणि तिला झोंप आल्यावर आपण फेरफटका करावा. पण तिने ऐकलें नाही, आणि त्याला आपल्या शेजारीं निजावयला लावलें. अर्थात् त्याला आनंदच झाला, पण त्याने त्याचा फाजील फायदा घेण्याचा प्रयत्न केला तेव्हां तिने ऐकलें नाही. चुंबनालिंगनाला तिने अडथळा केला नाही, पण त्यापुढे ती जाऊं देईना. ती नॉर्वेसारख्या थंड देशां-

तील असल्यामुळे मंदकाम असल्याचाही आरोप त्याने तिच्यावर केला, पण तिने शांतपणें उत्तर दिलें की हें खरें नाहीं, पण मी आपल्या प्रियकराकडे चाललें आहें. त्याच्यावर माझें प्रेम आहे, आणि प्रेमाशिवाय ही गोष्ट करणें मला पसंत नाही. पण ती त्याच्यावर बिलकुल रागावली नाही. शेवटी त्याने नाइलाज म्हणून प्रयत्न सोडून दिला, पण झोप न आल्यामुळे तो रात्रभर तळमळत होता. पण तिला पुरा आत्मविश्वास असल्यामुळे गाढ झोप लागली.

त्या मनुष्यानेच वरील गोष्ट सांगितली, आणि तो नंतर मलाक्का येथे गेला आणि एका पोर्तुगीज वेश्येने तेथे एक लढाऊ लोकांची टोळी तयार केली होती, तींत सामील झाला. फ्रेंच लोक नेपोलिअनबद्दल जशी आदराची भाषा वापरतात त्या पद्धतीने तो तिच्याबद्दल बोलत असे. पण तें कदाचित् त्याचें तिच्यावर प्रेम बसल्यामुळेही असेल. तिच्या टोळींत दहाबारा लोक होते आणि ती फ्रँकोविरुद्ध त्यांचा उपयोग अतिशय कुशलतेने करीत असे, आणि ती स्वतः लढाईत नेहमी पुढे असे. कधीही कोणावर जुलूम केल्याशिवाय, गोड बोलून खेड्यांतील लोकांकडून आपल्या टोळीपुरतें अन्न मिळवण्याची कलाही तिला अवगत होती. पण ती मूळची वेश्या असली तरी तिच्याशीं कोणी अतिप्रसंग करूं लागल्यास ती त्याला चापीत असे 'लाज नाही वाटत? लढाई चालू असतांना तुम्हाला हें सुचतें कसें?' ती सर्वांनाच सारखेपणाने वागवीत असल्यामुळे तिच्याबद्दल सर्वांनाच आदर वाटे, आणि सर्वजण तिचें मुकाट्याने ऐकत. कोणत्याही खेड्यांत टोळी गेली तरी ती आपल्यापुरती वेगळी खोली मिळवीत असे.

मलाक्का शत्रूच्या हातांत पडण्यापूर्वी कांही दिवस ती लढाईत जखमी होऊन मेली. आपले दिवस भरले असें जेव्हा तिला समजलें, तेव्हा तिची शुश्रूषा करण्याकरतां कांही लोक तिच्याजवळ रहायला मागत होते, परंतु तिने त्यांपैकी फक्त एकाला राहण्यास सांगून बाकीच्यांना दारूगोळा सुरक्षित ठिकाणीं ठेऊन लढाई चालू ठेवण्यासाठी पाठवलें. ते निघून गेल्यावर ती स्वतः त्या एका माणसाला घेऊन स्वस्थपणें मरतां येईल अशा ठिकाणीं जाऊन निजली, आणि त्याला म्हणाली 'मी आतां मरतें आहें, माझें शेवटचें चुंबन घे.'

या लढाईंत अनेक स्त्रिया केवळ प्रेमी पुरुषांजवळ रहायला मिळावें म्हणून शिरल्या होत्या. पुष्कळांना लढाईंत स्वसंरक्षणाची बिलकुल काळजी नसे, त्या खुशाल गोळीबार चालू असेल तेथे पुढे जाऊन मरत असत. अशा स्थितींत चालू सामाजिक नीतीची पुष्कळ स्त्रियांना बिलकुल परवा नव्हती यांत नवल नाही. जिवावर उदार होऊन लढणाऱ्या पुरुषांनी इच्छा दर्शवल्याबरोबर त्यांना शरीर अर्पण करण्यास त्या तयार असत, आणि तेंच आपलें इतिकर्तव्य समजत असत. यामुळे कोणताही कायदेशीर फरक केल्याशिवाय त्यांनी या दिवसांत कामविषयक स्वातंत्र्याचा पाया घातला, आणि स्पेनमधील लोकांत पौर्वात्य आणि पाश्चात्य अशा दोन्ही प्रकारच्या वेडगळ समजुती घर करून राहिल्या असल्यामुळे त्या एकदम समजूनउमजून मोडणें शक्यच नव्हतें हें लक्षांत आणल्यास, झालें हेंच पुष्कळ झालें असें म्हटलें पाहिजे.

---

# कुरूपता म्हणजे काय ?

( डॉ. पॅतो यांचे फ्रेंचवरून )

पुष्कळ लोक कुरूपता फक्त चेहऱ्यावरून ठरवतात आणि बाकीच्या शरीराचा मुळीच विचार करीत नाहीत. याचें मुख्य कारण म्हणजे बाकीचें बहुतेक शरीर झांकलेलें असतें आणि त्याची कुरूपता अनेक प्रकारांनी झांकण्याची संधि यामुळे मिळते. कोणत्याही कारणाने कां होईना, चेहऱ्याला फाजील महत्व मिळालेलें आहे, तेव्हा चेहऱ्याचा वेगळा विचार करणें वावगें होणार नाही.

चेहऱ्याची कुरूपता अनेक प्रकारची असूं शकेल. १. पुष्कळ आगंतुक कारणांनी चेहऱ्याची समता बिघडते, उदाहरणार्थ लढाईंत किंवा कोणत्याहि अपघाताने झालेल्या जखमा. लढाई वगळली तर अशा जखमांचें महत्त्वाचें कारण म्हणजे मोटार होय. न्यायासनें देखील चेहऱ्याच्या समतेचें महत्त्व मानतात आणि मोटारच्या अपघाताने ती बिघडली तर नुकसानभरपाई म्हणून मोठी रकम

देववतात. २. त्याचप्रमाणे अनेक रोगांमुळे चेहरा कुरूप होऊं शकतो. उदा० गर्मी, क्षय, रक्तपिती, कॅन्सर, यामुळे चेहरा भयंकर दिसूं लागतो. ३. कांहींचा चेहरा स्वभावतःच कुरूप असतो. कपाळ अत्यंत लहान, हनुवटी खूप पुढे आलेली किंवा मागे गेलेली, फाजील केंस, वगैरेंमुळे कांहींचा चेहरा जनावरांसारखा दिसतो, आणि तो पहाणाराच्या मनांत एकदम अविश्वास, किळस किंवा तिटकारा उत्पन्न होतो. ४ कांही चेहऱ्यांत केवळ असमता असते; नाक वांकडें असतें, डोळे पुढे आलेले असतात, कातडी सुरकुतलेली असते, वगैरे. चेहरा नेहमीच उघडा असल्यामुळें हे दोष तावडतोब दिसतात. हाडकुळी मान, खांदे आणि छाती झांकलेलीं असल्यास लक्षांत येत नाहीत.

बाकीच्या शरीराच्या कुरूपतेकडे कोणी फारसें लक्षच देत नाही कोणाच्या मानेचें हाड पुढे आलेलें असतें, पाटींत पोंक असतें, छाती अरुंद असते, पोट पुढे आलेलें असतें, हातांपायांच्या काड्या असतात किंवा ते फाजील जाड असतात, सांधे बेढब असतात. हे प्रकार सामान्यतः सर्वत्र दिसतात आणि त्यांचीं कारणें म्हणजे बसकें काम, व्यायामाचा अभाव, अपुरी वाढ, वेडेंवांकडें बसण्याची किंवा उभें राहण्याची संवय, मेदवृद्धि किंवा कृशता, त्वचेचे विकार वगैरे. सुधारलेल्या समाजांत आदर्श शरीर जवळजवळ कोणाचेंच नसतें म्हटलें तरी चालेल.

याचें कारण काय? थोड्या विचारांतीं तें स्पष्ट दिसून येतें. सुधारलेल्या समाजांतील माणसांचें जीवन इतकें कृत्रिम झालेलें आहे की मनुष्य आहे यापेक्षा अधिक कुरूप कसा झाला नाही याचेंच आश्चर्य वाटतें. मनुष्याने स्वतःच कुरूपतेचीं इतकीं वेगवेगळीं कारणें उत्पन्न केलेलीं आहेत की इतके असूनही त्याचें शरीर इतकें तरी चांगलें रहायला त्याच्या शरीराची मूळची स्वसंरक्षणशक्ति कांही विलक्षण असली पाहिजे याची खात्री होते.

कुरूपता हा मनुष्याच्या कृत्रिम राहणीमुळे उत्पन्न झालेला एक रोग आहे, आणि त्याला रोग समजून त्यावर उपचार केले पाहिजेत. मात्र हे उपचार म्हणजे कुरूपता झांकण्याचे उपाय नव्हत. ती नाहीशी करण्याचे उपाय केले

पाहिजेत, आणि ती आटोक्यांत आहे तोंच ते उपाय केले पाहिजेत. जादूचे चमत्कार करण्याची शक्ति निसर्गांतही नाही आणि वैद्यकांतही नाही. कधीकधी मेदवृद्धीमुळे त्वचा इतकी ताणलेली असते की ती मूळपदावर येणें अशक्य होतें, किंवा पाठीचा कणा इतका वांकलेला असतो की शस्त्रक्रियेनेही कांही करतां येत नाही. तेव्हा कुरूपतेवर प्रतिबंधक उपाय सर्वांत चांगले.

सुदैवाने हल्ली मुलांच्या प्रकृतीकडे लक्ष देण्याची प्रवृत्ति वाढत आहे. तरीपण अजून देखील स्वतःच्या नट्टापट्ट्यांत बिलकुल कसूर न करणाऱ्या आया अजूनसुद्धां आपल्या मुलांच्या सौंदर्याकडे जरूर तितकें लक्ष देत नाहीत. आणि स्वतःची काळजी घेतात म्हणजे तरी काय ? मुख्यतः चेहेऱ्याची काळजी आणि फारतर हातांची. बाकी शरीर लोकांना दिसत नाही, मग त्याची काळजी कशाकरतां घ्यायची ! शिवाय कुरूपतेची चेष्टा करण्याची जी प्रवृत्ति सर्वत्र दिसते, तीमुळे कुरूपतेवर उपाय करणें अत्यंत कठिण होतें. विशेष प्रकारच्या कुरूपतेकरतां विशेष प्रकाराच्या व्यायामांची जरूरी असते, पण अशा प्रकारचे व्यायाम शिकवणारी एखादी व्यायामशाळा असलीच, तर चेष्टा करण्याच्या प्रवृत्तीमुळे कुरूप माणसांना तेथे जाण्याची लाज वाटते, आणि यामुळे ज्यांना विशेष जरूर असते त्यांना त्याचा फायदा घेतां येत नाही, आणि ज्यांचें शरीर अगोदरच चांगलें असेल त्यांनाच व्यायामाचा फायदा मिळतो. ही चेष्टा करण्याची प्रवृत्ति निदान डाक्तरांत तरी असूं नये आणि त्यांनी कुरूपतेवर उपाय करण्याची कांहीतरी व्यवस्था करणें जरूर आहे.

---

# पेंचप्रसंग

—सर, मला थोडीशीं गणितें अडलीं आहेत, सांगाल का ?

—अं ? हं, सांगेन. पण आधी ‘ सर ’ म्हणूं नका, आणि ‘ गणितें ’ म्हणूं नका. म्हणजे हरकत नाही. पण आत्तां मात्र मला वेळ नाही, पुनः केव्हां तरी विचारा.

पद्मा फडके कांही दगड नव्हती. पण मध्यंतरीं आजारी असल्यामुळे वर्गांत झालेला कांही भाग तिला समजत नव्हता. प्रो. वामनराव प्रसंगे विलायतेंतून कीर्ति मिळवून आले होते. तेथे त्यांनी तीन वर्षे घालवलीं होतीं, आणि त्या अवधींत त्यांनी आपल्या बायकोला कोंकणांत आपल्या घरीं ठेवली होती. पण ही ठेव त्यांना परत मिळाली नाहीं. ते विलायतेंत असतानांच ती वारली. ती कशानें मेली हें त्यांना कधींच धडसें कळलें नाही. तिच्यासंबंधी कांही अफवा त्यांच्या कानावर आल्या होत्या, आणि तिने कांही कारणाने जीव दिला असेंहि कांही लोक म्हणत. घरच्या माणसांचें म्हणणें पडलें की ती विषमज्वराने मेली. ती मेल्यावर त्याची जास्त चिकित्सा करण्यांत अर्थ नव्हता, पण त्यामुळे वामनराव इतके उद्विग्न झाले होते की पुनः लग्नाच्या भानगडींत पडायचें नाहीं असें त्यांनी मनाशीं ठरवून टाकलें होतें. या घटनेने त्यांना सामाजिक प्रश्नांसंबंधी विचार करायला लावलें आणि मित्रमंडळींत चर्चा करतांना ते आपले विचार जोराने मांडूं लागले.

पद्मा विधवा होती. तिचा नवरा लग्न झाल्याबरोबरच वारला होता आणि धाकट्या दिराच्या आग्रहावरून तिला आपलें शिक्षण पुढे चालवायला सवड मिळाली होती. त्याचीहि त्यांत सोय होती, कारण त्याची बायको नेहमी आजारी असल्यामुळे माहेरींच असे. तेव्हा भावजईला आणून मुंबईत बिऱ्हाड केल्यामुळे त्याची जेवणाची सोय आयतीच झाली होती.

प्रो. प्रसंग घरीं केव्हा असतात याचा त्यांच्या नोकराजवळ तपास करून पद्मा नेमक्या वेळीं त्यांच्या घरीं गेली. घरीं ते एकटेच रहात असत. नोकराने दार उघडून त्यांची बसण्याची खोली दाखवली. ते वाचनांत गढून गेले होते, तेव्हा तिने दारांतूनच 'मी येऊं का ?' म्हणून विचारलें. तेव्हां त्यांनी वर पाहून, उठून पुढे येऊन तिचें स्वागत केलें.

—या, काय काम आहे ?

—मी परवां कालेजांत विचारलें होतें, तेव्हा आपल्याला वेळ नव्हता, म्हणून...





—हां हां, मी विसरलोंच होतों. तुम्हाला ' गणितें ' अडलीं आहेत नाही का?

—पण ' गणितें ' म्हणायचें नाही ना?

—हें तुमच्या लक्षांत राहिलें? ठीक.

—पण मग म्हणायचें काय?

—'उदाहरणें' म्हणावें, 'प्रश्न' म्हणावें. बरें पण मी तुम्हाला असें विचारतों कीं वर्गांत तुम्ही काय करीत असतां? तेथे मीच शिकवतों. तेथे समजलें नाही-तर तुमचें लक्ष नसतें किंवा मला शिकवतां येत नाही असा त्याचा अर्थ होतो. तसें असलें तर सांगा, म्हणजे मला कांही सुधारणा करतां येईल.

—तसें नाही. तुम्ही उत्तम शिकवतां असेंच सगळीं मुलें म्हणतात, पण मी मधें आजारी होतें म्हणून कॉलेजांत जातच नव्हतें. एरवीं मला समजतें.

—बरें मग काढा काय आहे तें.

यानंतर पद्मा त्यांच्याकडे वारंवार जाऊं लागली आणि तिला जायला सबब जरी चांगली होती, तरी ती वारंवार जाऊं लागल्यामुळे लोकांत कुजबुज सुरू झाली. ती विधवा होती आणि प्रो. प्रसंगे सुधारक अशी बोलवा असल्या-मुळे हे लवकरच या पंकांत रुतलेल्या गाईचा उद्धार करणार असें लोक म्हणूं लागले. पद्मा रूपाने जरी अप्सरा नव्हती तरी शंभर जणींत उठून दिसेल अशी होती. वामनराव जरी विशेष देखणे नव्हते तरी कुरूपहि नव्हते, आणि त्यांच्या चेहऱ्यावर हुशारीचें तेज होतें. चेहऱ्यावरून हुशार दिसणारे लोक कधीकधी दगड असतात हें खरें, पण त्यांची गोष्ट तशी नव्हती हें वर सांगितलेंच आहे. अशा स्थितींत या दोघांच्या ओळखीचें स्नेहांत आणि नंतर प्रेमांत रूपांतर झाल्यास नवल मुळीच नव्हतें. तथापि वामनरावांनी पुनः लग्न न करण्याचा जो निश्चय केला होता, तो त्यांना तिच्याशीं अधिक सलगी करूं देत नव्हता. यामुळे हें प्रियाराधन नेहमीच्या उलट दिशेने होत होतें. नेहमीची पद्धत म्हणजे पुरु-षाने थोडी लगट करण्याचा प्रयत्न करायचा आणि स्त्रीने थोडें मागें सरायचें, किंवा निदान तसें दाखवायचें. त्याच्या उलट येथे होत असे. उदाहरण समजाऊन

देतांना वामनराव कागदावर लिहून दाखवूं लागले, म्हणजे तें पाहण्याकरतां तिला त्यांच्या जवळ बसावें लागे. तें किती जवळ बसायचें हें कोण ठरवणार ? एक पद्धत म्हणजे शक्य तितकें लांब बसून मानेला ताण देऊन पहायचा प्रयत्न करायचा. दुसरी पद्धत म्हणजे एखादे वेळीं स्पर्श झाला तरी हरकत नाहीं, पण मानेला ताण न पडेल आणि तरी सहज दिसेल इतकें जवळ बसायचें. यांतला तिने दुसराच मार्ग पतकरला आणि तिने तो पतकरल्यावर ते तिला लांब बसायला कसे सांगणार ! बायकांना नैसर्गिक लज्जा असते असा एक लोकभ्रम आहे, पण निरीक्षण करणाराला हें सहज दिसतें की पुरुषांचाच विनय नैसर्गिक असतो आणि बायकांना तो लहानपणापासून शिकवावा लागतो. यामुळे प्रो. प्रसंगे जसजसे अंग चोरूं लागत, तसतशी ती अधिक जवळ बसूं लागल्यामुळे शेवटी त्यांना अंग चोरणें अशक्य झालें. त्यांतून त्यांच्या घरांत नोकराशिवाय कोणीच नव्हतें आणि तोहि नेहमी घरींच असे असें नाही. यामुळे तिला लाजायचें फारसें कारणच नव्हतें. हा प्रकार नोकराच्याहि लक्षांत आला होता, आणि ही बाई आपली धनीण होणार असेंच तो धरून चालल्यामुळे एखादे वेळीं वामनराव घरीं नसतांना ती येऊन त्यांची वाट पहात बसली तर तो आपल्याच जबाबदारीवर तिला चहा देऊं करीत असे आणि ती प्रथम नको म्हणाली तरी नंतर घेऊं लागली.

हें असें बरेच दिवस चाललें होतें. अलीकडे ती मुद्दाम सोपीं उदाहरणें देखील विचारायला येत असे हें त्यांच्या लक्षांत आलें असें पाहून एके दिवशीं ती नुसतीच येऊन बसली आणि त्यांनी ‘ काय आहे ? ’ म्हणून विचारतां ‘ कांही नाही, उगाच आलें. ’ असें उत्तरली. ती आली म्हणजे त्यांच्या अगदी जवळ जाऊन बसायची याची आतां संवयच झाली होती. तशीच ती कारण नसतांहि त्यांच्या कोचावर खेटून बसली आणि त्यांना बोलायला अवसर न देतां इकडच्या तिकडच्या गप्पा मारूं लागली. अर्धा पाऊण तास झाला तरी ती हालेना असें पाहून वामनराव म्हणाले, ‘ आतां आपण चहा घेऊं या. आज गडी गेला आहे बाहेर, तेव्हा मीच तुम्हाला चहा करून देतों. ’ असें म्हणून ते चहाच्या तयारीला लागले.

—' मला सांगा ना. मी करतें ' पद्मा म्हणाली.

—छे छे, तुम्ही बसा आपल्या. पाहुण्यांना कोठे चहा करायला सांगतात का ?

—काय झालें त्यांत ? हीं बायकांचीं कामें बायकांनीच करावीं.

—ती आपली तुमची समजूत आहे. पुरुषांनी मनांत आणलें तर करतां येणार नाही अशी गोष्टच नाही. शिवाय माझा गडी पुरुषच आहे, तो किती चांगला चहा करतो तुम्हाला माहीत आहे.

चहा घेऊन झाल्यावर वामनराव म्हणाले, ' आतां मला माफ करा. मला बाहेर गेलें पाहिजे. '

—इश्श ! मी बराच वेळ गप्पा मारायला म्हणून आलें होतें, तर तुम्ही आपले बाहेर चाललांत.

—मग पुनः केव्हा तरी या. आत्तां मला गेलेंच पाहिजे.

—मग अमुक दिवशीं असें सांगा. नाहीतर केव्हातरी आलें म्हणजे आपलें पुनः पळून जायला बरें.

—नाही नाही, पळून जायचें काय कारण आहे ? येत्या शनिवारीं या, मग आपण बोलूं.

पद्मा बिचारी घरीं परत गेली. तिचा दीर तिला अतिशय चांगल्या रीतीनें वागवीत असे इतकेंच नाही तर स्वयंपाकांत देखील मदत करीत असे, आणि शिवाय त्याच्यामुळेच तिच्या पुढच्या शिक्षणाची परवानगी मिळून सोय झाली होती हे त्याचे उपकार होतेच. त्याचा स्वभावहि मनमिळाऊ होता, पण तो अलीकडे तिच्याशीं बरीच लगट करूं पहात होता तें तिला आवडत नव्हतें. तिचें मन जर अगोदरच वामनरावांकडे कललें नसतें तर त्याचा काय परिणाम झाला असता हें सांगणें कठिण, पण हल्ली तिची स्थिति फार चमत्कारिक झाली होती. त्याचें मन दुखावल्यास आपलें शिक्षण बुडेल एवढीच भीति त्यांत होती असें नाही, तर अशा सुस्वभावी दिराचें मन दुखावणेंहि तिला कठिणच होतें. अनंतरावाला बेताच्या पगाराची नोकरी होती, त्यांतूनच तिच्या शिक्ष-

णाचा खर्च चालत असे. त्या दिवशीं ती घरीं गेली तेव्हा तो घरीं नव्हता, पण तो कचेरींतून आल्यावर तिच्या मनांतील चलबिचल त्याच्या ध्यानांत आल्याशिवाय राहिली नाही.

पद्मा ठरल्याप्रमाणे शनिवारीं वामनरावांकडे गेली, पण यावेळींहि तिचा हिरमोड झाला. शनिवार असल्यामुळे वामनरावांची कांही मित्रमंडळी जुहूला जायला निघाली होती, आणि ते वामनरावांना आग्रह करायला आले होते. पद्मा आली असल्यामुळे वामनराव येत नाहीत असें पाहून त्यांनी तिलाहि आग्रह केला. त्यांच्याबरोबर कांही बायकाहि होत्या आणि त्यांचा पोहायचा बेत होता, तेव्हा पद्माला कांहीतरी नेसायला पाहिजे म्हणून तें घेण्याकरतां मोटर तिच्या घरावरून घ्यायचें ठरलें आणि तीहि जुहूला गेली. अर्थात् तिला घरी परत यायला उशीर झाला, तेव्हा ही सगळी हकीकत दिराला सांगणें भाग पडलें.

यानंतर पुनः जेव्हा ती वामनरावांकडे गेली, तेव्हा मात्र कोणताहि अडथळा न येतां त्यांना मनसोक्त बोलायला मिळालें. नोकरही बाहेर गेला होता, तेव्हा कोणतीच अडचण नव्हती. एकमेकांची माहिती परस्परांना सांगून झाली, सिनेमानाटकांवर चर्चा झाली, आणि या सर्व गोष्टी अगदी शेजारीं बसून. वामनराव कितीहि जपून वागले, तरी या सान्निध्याचा परिणाम त्यांच्यावर झाल्याशिवाय कसा राहणार? चंद्राला पाहून समुद्राला भरती येते ही कांही समुद्राची चूक म्हणतां येणार नाही, आणि लाटा न येऊं देण्याचा समुद्राने आपल्याकडून कितीहि बेत केला, तरी तो सिद्धीस कसा जाणार? तथापि वामनरावांना लग्नाच्या भानगडींत पुनः पडायचें नव्हतें, तेव्हा याचा शेवट काय होणार याची त्यांना भीति होती. जातेवेळीं 'मी जातें आतां' म्हणून जेव्हा ती एकदम त्यांच्याकडे वळली, त्या वेळीं तिचें तोंड इतकें जवळ आलें होते की दुसरा कोणी असता तर चुंबन घेतल्याशिवाय राहता ना. पण त्यांनी स्वतःला आवरलें आणि इतक्यांत नोकर परत आल्यामुळे ती ताबडतोब निघून गेली.

या सर्वांचा परिणाम वामनरावांपेक्षा पद्मावरच जास्त झाला होता आणि याचा फायदा त्या रात्रीं तिच्या दिराने घेतला. जेवण झाल्यावर ती नेहमी थोडावेळ वाचीत बसत असे, त्याऐवजी ती रडत असलेली पाहून त्याने तिला कुरवाळून रडण्याचें कारण विचारलें, पण ती कांहीच न बोलतां जास्तच रडूं लागली. तेव्हा अर्थातच त्याने तिला जास्त जवळ घेतली, आणि याचें पर्यवसान म्हणजे केवळ तिच्या उत्तेजित स्थितीमुळे तिला त्या रात्रीं त्याला दूर ठेवतां आलें नाही.

या चुकीचा परिणाम तिला जेव्हा लवकरच वांत्यांच्या रूपाने जाणवूं लागला, तेव्हा यांतून तोड काय काढावी हें त्या दोघांनाही संकट पडलें. वामनरावांनी तिला उघड झिडकारलें नव्हतें, तेव्हा ती या अवधींत त्यांच्याकडे बऱ्याच वेळां गेली होती आणि एका वेळीं वामनरावांनाही मोह अनावर होऊन त्यांचा संबंध घडला होता. ती वामनरावांबद्दल दिराजवळ बऱ्याच वेळां बोलत असे आणि त्यांची अतोनात स्तुति करीत असे, यामुळे तिच्या प्रेमाची दिराला थोडीबहुत कल्पना होतीच. आतां त्याने अशी युक्ति काढली की ती गरोदर झाली आहे हें वामनरावांना सांगून त्यांना तिच्याशीं लग्न करायला भाग पाडावें. अशा स्थितींत सुद्धां त्यांना फसवणें तिला बरें वाटलें नाही, आणि तिने या बेताला संमति दिली नाही.

तथापि अनंतराव एकदां या उद्देशाने वामनरावांकडे गेलाच आणि आपली ओळख देऊन म्हणाला, 'पद्मा आपल्याकडे वारंवार येते हें मलाच नव्हे तर पुष्कळ लोकांना माहीत आहे. आतां ती गरोदर झाली आहे हें आपलेंच कर्म असलें पाहिजे हें उघड आहे, तेव्हा तुम्ही तिच्याशीं मुकाट्याने लग्न करावें एवढाच यांतून मार्ग आहे. तिच्या आईबापांना आणि सासूसासऱ्यांना तें आवडणार नाही, पण तें मी पाहीन. हें तुम्ही कबूल न केलें तर मात्र तिचीच नव्हे तर तुमचीहि बेअब्रू झाल्याशिवाय राहणार नाही.'

ती गरोदर आहे हें ऐकून वामनराव थक्कच झाले होते, पण अनंतरावाचें

भाषण संपल्यावर ते शांतपणें म्हणाले, ‘ हें माझें कृत्य आहे ही आपली समजूत चुकीची आहे, आणि पुनः लग्न न करण्याचा माझा निश्चय आहे तो बदलण्याचें मला कारण दिसत नाही. ’

अनंतरावाला भांडण करण्यापासून कांहीच फायदा नव्हता, तेव्हा तो सामोपचाराने म्हणाला, ‘ हें तुमचें कृत्य नाही असेंहि घटकाभर धरून चाललें तरी देखील या प्रकरणाचा जर बभ्रा झाला तर तुमची बेअब्रू होईल. इतकेंच नव्हे तर तुमच्या नोकरीवरहि कदाचित् गदा येईल. पुण्यांतला एक प्रोफेसर वेश्येच्या घरीं जातांना दिसल्यावरून त्याला बडतर्फ केल्याची हकीकत तुम्हाला माहीतच असेल. तेव्हा याचा विचार करा, पण लवकर करा. कारण याचा कांहीतरी निकाल केलाच पाहिजे. शिवाय पद्मा कांही वाईट मुलगी नाही, तिच्याशीं लग्न केल्याने तुम्हाला बिलकूल कमीपणा येणार नाही. ’

--तुम्हाला सरळ सांगून तुम्ही ऐकाल असें दिसत नाही. आतां तुमच्याच भाषेंत सांगतों की राजश्री, याचा बभ्रा झाला तर तो माझ्या गळ्यांत न येतांना आपल्या गळ्यांत येईल. माझ्या घरीं ती येते ही गोष्ट खरी, पण तुमच्या तर ती घरींच राहते. इतकेंच नव्हे तर मजकडून कोणालाहि गर्भ राहणें शक्य नाही असा भक्कम पुरावा मी देऊं शकेन.

—तो कसा काय ?

--तें मी सांगतों, म्हणजे तरी तुम्ही भलताच वेडेपणा करणार नाही. मी विलायतेंत असतांना माझी बायको वारली आणि तेव्हाच मीं निश्चय केला कीं पुनः लग्न करायचें नाही. तेथे आमच्या मित्रमंडळींत संततिनियमनाबद्दल बरीच चर्चा होत असे, आणि त्याकरतां जी शस्त्रक्रिया करतात तीसंबंधी एकदां एका मित्राशीं बोलणें चाललें होतें. तेव्हा तो म्हणाला ‘ लोकांना सांगायला काय होतें ? पण हें अजून नवीन आहे, आणि त्याने आपल्या पौरुषाला धक्का लागेल की काय अशी लोकांना साहजिकच भीति वाटते. याचा अनुभव कोणीं घेतला आहे का ? ’ मी म्हणालों ‘ मला कांही आतां लग्न करायचें नाही, तेव्हा शस्त्रक्रियेचा खर्च

द्यायला कोणी तयार असेल तर मी स्वतः अनुभव घ्यायला तयार आहें.' मी उगाच बढाई मारतों आणि खरोखर तयार होणार नाही, अशा समजुतीने तो म्हणाला 'मी खर्च देतों. कधी करून घेतां?' मी म्हणालों 'म्हणाल तेव्हा.' त्याप्रमाणे सगळी व्यवस्था होऊन मीं शस्त्रक्रिया करून घेतली.

—पण याचा पुरावा काय?

—याचा पुरावा त्या डाक्तराकडून जरी न मिळाला, तरी त्याचा प्रत्यक्ष पुरावा मला केव्हाहि देतां येईल, हें कोणीहि डाक्तर तुम्हाला सांगेल. तेव्हा मला तर उघड दिसतें की तिला गर्भ राहिला असला तर त्याला जबाबदार तुम्ही आहां, मी नव्हे.

ते इतकें बोलतात तों पद्मा आंत आली. ती बराच वेळ रडली असावी असें चेहऱ्यावरून दिसत होतें. ती दिराला पाहतांच म्हणाली 'शेवटीं तुम्ही आलांतच ना इकडे? मीं तुम्हाला बजावलें होतें मला हें पसंत नाही म्हणून. तें कांही नाही, मी त्यांना सगळें खरें सांगणार. मग काय व्हायचें असेल तें होईल.'

**अनंतरावः—**पद्माताई, आतां सांगायचें कांही राहिलेलें नाही. त्यांनी सगळें तर्कानें ताडलें आहे. ही चूक सर्वस्वी माझीच आहे, पण तिचे परिणाम मात्र भलत्याला भोगावे लागणार आहेत. वामनराव, यांत पद्माची कांही चूक नाही. तिचें तुमच्यावर खरोखरच प्रेम आहे. मी केवळ तिच्या क्षुब्ध मनः-स्थितीचा फायदा घेतला, पण मला आतां त्याबद्दल पश्चात्ताप होतो आहे. आपण जर मन थोर करून यांतून आमची सुटका केली नाही, तर माझ्या चुकीचें प्रायश्चित्त तिला बिचारीला जन्मभर भोगावें लागणार आहे. तेव्हा......

**वामनराव—**तुमच्यांकडे प्रेमहि बरेंच स्वस्त आहे आणि पश्चात्तापहि स्वस्त आहे. हें कसलें प्रेम आलें आहे आणि कसला पश्चात्ताप!

**अनंतराव—**माझें एक राहिलें, मला पश्चात्ताप झाला आहे हें सिद्ध करायला कांहीच मार्ग दिसत नाही. पण तुमच्यावर तिचें प्रेम आहे हें मी अगदी ईश्वराला स्मरून सांगतों. ती तुमची किती स्तुति करीत असते ती जर तुम्ही

ऐकली असती तर तुम्हाला संशय राहिला नसता. तुमची खात्री कशी करावी हेंच मला समजत नाही.

पद्मा कांहीएक न बोलतां एका बाजूला तोंड करून रडत होती. तिकडे वामनरावांचें लक्ष गेलें आणि ते तिच्याकडे वळले असें पाहून अनंतराव मुकाट्याने निघून गेला.

—' तुमचें काय म्हणणें आहे याबद्दल ? ' वामनरावांनी विचारलें.

—मला हें असलें मारूनमुटकून लग्न व्हायला नको आहे. माझें काय व्हायचें असेल तें होईल. प्रेमाऐवजी दयेने मनुष्य लग्न करूं लागला, म्हणजे शेवटी पश्चात्तापाची वेळ यायचीच. तुम्हाला या संकटांत घालायची माझी इच्छा नाही. आपल्या चुकीबद्दल दुसऱ्याला कां त्रास ? तुमचें कांही माझ्यावर प्रेम नाही.

—बरें, माझी लग्न करायची इच्छा असली तर ?

—पण ' प्रेम आहे ' असें कांही म्हणवत नाही !

—म्हणायचें काय त्यांत ? प्रेम हें नेहमी वागणुकीवरून दिसतें. म्हटल्यानें त्यांत कमजास्त होत नाही.

—मला नाही असलें समजत !

—बरें ' प्रेम आहे ' म्हणतों. आतां झालें ?

# शारदेचें पत्र

येथे नुकत्याच झालेल्या साहित्यसंमेलनांत आचार्य अत्र्यांनी अश्लीलतेची एक व्याख्या सांगितली. कामविषयक चिकित्सा करण्यांत ज्यानी जन्म घातला अशा हॅवलाक एलिस सारख्या लोकांचें असें मत आहे की अश्लीलता हा कोणत्याहि लिखाणाचा किंवा वस्तूचा गुण नाही. अश्लीलतेचा आरोप करणाराच्या मनाचा तो गुण आहे,मनाची एक प्रकारची विकृति आहे. प्रत्येक जण अश्लीलतेची

व्याख्या वेगवेगळी करतो हा त्याला एक सबळ पुरावा आहे. अत्रे म्हणतात 'लैंगिक प्रक्रियेविषयी जें वाङ्मय मनांत ओंगळ कल्पना उत्पन्न करतें तें अश्लील. संस्कृत वाङ्मयाला किंवा सौभद्राला अश्लील म्हटलेलें त्यांना खपत नाही. वास्तविक जे सनातनी हल्लीच्या वाङ्मयावर अश्लीलतेचा आरोप करतात, त्यांना उत्तर म्हणूनच तो आरोप संस्कृत वाङ्मयावर केलेला असतो, आणि उत्तर या दृष्टीने तें ठीकच आहे. जे अश्लीलता मानतात त्यांचाहि या बाबतींत बराच घोटाळा होत असतो. संस्कृत भाषेंतला शब्द अश्लील नसतो; पण त्याच अर्थाचा मराठी शब्द अश्लील असतो. 'मात्रागमनी' हा शब्द अश्लील नाही, पण तेंच शिमग्याच्या भाषेंत कोणी म्हटलें म्हणजे तें अश्लील होतें. वास्तविक असें कां वाटावें ? इंग्रजींतहि हीच स्थिति आहे. तेथें लॅटिन शब्द अश्लील नसतो, इंग्रजी अश्लील असतो. अर्थ जर तोच आहे, तर अश्लीलता काय अमुक अक्षरांच्या आवाजांत भरलेली आहे. त्यांत कांहीतरी जादूटोणा आहे, मंत्रतंत्र आहे. मिसेस बेझंट यांनी एकदां न हंसतां सांगितलें होतें की मंत्राचा जो परिणाम होतो तो केवळ त्यांतील अक्षरें विशिष्ट अनुक्रमाने उच्चारल्यामुळें जो आवाज होतो,त्याने हवेंत उत्पन्न होणाऱ्या लहरींवर अवलंबून असतो,त्यांतील अर्थावर नव्हे. यामुळेच प्रार्थनासमाजाच्या पद्धतीने लग्न लावलें तरी तें लागत नाही, तें सरकारांत नोंदावें लागतें. कारण प्रार्थनासमाजी लोक विवाहमंत्रांचा मराठी अर्थ करतात, त्यामुळे उच्चार बदलतो. तसच कारण अश्लीलतेच्या बाबतींतहि असावें असें अत्र्यांचें म्हणणें दिसतें. हें म्हणणें कायद्यालाहि मान्य आहे, कारण अश्लीलता भाषेवर अवलंबते, अर्थावर नव्हे, असें येथल्या हायकोर्टाने सांगितलेलें आहे. तरीपण एखादा मॅजिस्ट्रेट या तत्वाला न जुमानतां स्वतःला पसंत नसलेलीं मतेंहि अश्लीलतेच्या कायद्याखाली आणतो, कारण हा अत्याचार करण्याची मॅजिस्ट्रेटांना कायदेशीर परवानगी आहे. ज्याचें मन अश्लील, त्याला कशांत अश्लीलता दिसेल याचा नियम नसतो. याचा अत्र्यांनाहि अनुभव आलेला आहेच. अत्र्यांनी व्याख्या केली आणि अश्लीलतेला 'ओंगळपणा' म्हटलें. यापेक्षा त्यांच्या व्याख्येचा अधिक काय अर्थ होतो ?

एका शब्दाऐवजीं दुसरा शब्द ही व्याख्या नव्हे. मूळ अडचण त्याने नाहीशी होत नाही.

त्यांतल्या करमणुकीच्या कार्यक्रमापैकी दोन्ही नाटकें चांगलीं झालीं, पण काव्यगायनाचा जवळ जवळ फार्सच झाला. ज्यांना पाय सुद्धां उचलण्याची पंचाईत, अशा अशक्त मुलांमुलींकडून लष्करी थाटाचीं गाणीं म्हणवण्यांत काय औचित्य आहे? असें एक गाणें म्हणतांना प्रेक्षकांनी हुर्यो केली नाही, याचा फायदा घेऊन तसलेंच दुसरें गाणें त्यांच्यावर लादणें योग्य आहे काय? ही कवीची आणि म्हणणारांचीहि फजीति आहे. कवितांची निवड अत्यंत गचाळ होती. नाही म्हणायला तांब्यांची कविता मात्र चांगली होती आणि म्हटलीहि चांगली. नाटेकरबाईंचें चऱ्हाट म्हणण्याबद्दल बक्षिस दिलें असें ऐकलें, पण त्याची लांबी एक चतुर्थांश असती तर अधिक बरें झालें असतें. सर्वांत हास्यास्पद झालें म्हणजे मा. कृ. शिंद्यांचें द्वंद्वगीत. हें गीत तरुणतरुणीच्या द्वंद्वाकरतां लिहिलेलें आहे, लहान मुलांकरतां नव्हे, आणि दोन लहान मुलींकरतां तर नव्हेच नव्हे. त्यांपैकी एकीला मुलाचा पोषाख दिल्याने त्यांत कांही फरक होत नाही. त्यांतल्या त्यांत पुरुषाचा पोषाख केलेली मुलगी दिसायला बरी होती, पण म्हणतांना तिला हंसूं येत होतें याबद्दल तिला कोण दोष देईल? तो सर्वच प्रकार हास्यास्पद होता. तो मा. कृ. शिंद्यांची फजीति करण्याकरतां केला होता काय? मुलींचें काम करणाऱ्या मुलीला इतकी हिडिस रंगवली होती, की तिच्याकडे पाहणें म्हणजे शिक्षा होती. पुरुषांनी बायकांचीं कामें केलेलीं पाहण्याची लोकांना निदान संवय झालेली आहे, पण याउलट प्रकार मात्र अधिकच हास्यास्पद होतो. या दृष्टीनें पहिल्या दिवशींच्या नाटकांत स्त्रियांनी स्त्रियांचीं कामें केलीं असल्यामुळे तें सुंदर वठलें. पण दुसऱ्या दिवशीं नाशिककरांच्या नाटकांत मात्र स्त्रीचें काम पुरुषाने केलेलें पाहण्याचा प्रसंग आला. तें प्रहसनच असल्यामुळे प्रेक्षकांना एवींतेवीं हंसायचेंच होतें, तेव्हा या पुरुषनटीलाहि हंसण्याचा त्यांना प्रसंग आला तरी मोठेंसें बिघडलें नाही. एकंदरींत नाशिककरांचा उत्साह स्तुत्य

आहे, पण त्यांनी असा अहेतुक विनोद न केल्यासच अधिक प्रगति शक्य आहे, एरवी नाही. करमणुकींतहि इकडे लक्ष देणें जरूर आहे, कला कलेकरतां असावी की आणखी कशाकरतां असावी हा प्रश्न येथे उत्पन्नच होत नाही, कारण ही कलाच नव्हे, हा कलेचा खून आहे.

धर्माचें वेड कधी नाहीसें होईल की नाही कोणाला ठाऊक ! इकडे कांही मुसलमान पुढारी राजकीय बाबतींतहि धर्माचेंच घोडें पुढें ढकलून हिंदुमुसलमानांतली दुही कायम करण्याची खटपट करीत आहेत, तर पुढारी म्हणवणारे कांही हिंदू आमचाच धर्म श्रेष्ठ म्हणून टेंभा मिरवूं पहात आहेत. साताऱ्च्या 'अलंकार' मासिकांत दे. भ. पु. पां. गोखले, बी. ए. यांनी 'गीताधर्मच श्रेष्ठ कसा ?' या मथळ्याचा एक लेख लिहिला आहे. 'गीता हें मोक्षदृष्टया संसार कसा करावा याचें शास्त्र आहे' असें टिळकांचें म्हणणें देऊन, 'संसार तर प्रत्येकाच्याच मागे लागलेला आहे, म्हणून अनार्यांप्रमाणेच म्लेंछ जे मुसलमान, ख्रिस्ती, आदिकरून लोक, त्यांनाहि गीताशास्त्रच उपयोगी आहे काय ?' असा प्रश्न विचारून त्याचें उत्तर 'होय.' असें हे गृहस्थ देतात. इतर लोकांचा मेंदू थोडा कमी दर्जाचा आहे असें ते गृहीत धरतात, तरी पण युरोपियन लोक आर्यच असल्यामुळे उत्तरध्रुवाजवळ असतांना त्यांचा धर्म वैदिकच होता, तेव्हा पौर्वात्य तत्वज्ञान ग्रहण करण्याची शक्ति त्यांना मूळचीच आहे असा निर्वाळा त्यांनी दिला आहे. नंतर गीताधर्माची श्रेष्ठता सिद्ध करायला त्यांनी अनेक भरमसाट विधानें केलीं आहेत. "'वासुदेवः सर्वमिति' ची संसिद्धि होण्याला अनेक जन्म लागतात असा जिथे गीतेचा शास्त्रशुद्ध सिद्धांत आहे, तेथे पुनर्जन्मावर विश्वासच नसलेल्या ख्रिस्तानुयायांना आपला धर्म जागतिक धर्म होईल असें कोणत्या तोंडाने म्हणतां येईल ?" हा गीतेचा सिद्धांत शास्त्रशुद्ध म्हणणाराला शास्त्र म्हणजे काय हेंच माहीत नसावें. पण गीतेसंबंधी हा जो घमेंडखोरपणा त्यांचे अंगीं आहे, तोच ख्रिस्त्यांच्याहि अंगीं असतो आणि त्याचेच जोरावर ते ख्रिस्ती धर्माबद्दल वरील लेखकाप्रमाणेच भरमसाट विधानें करतात

यांत नवल काय ? दोघांचाही दर्जा एकच. घमेंडखोरपणा हेंच त्यांचें शास्त्र आणि हाच त्यांचा आधार.

मुसलमानी धर्माचीहि त्यांनी याचप्रमाणे वासलात लावली आहे, कारण त्याचाहि पुनर्जन्मावर विश्वास नाही. अरबस्थानांत ऊर्दू भाषेंत एका दगडावर कोरलेली गीता सांपडली आहे, आणि तेथे महंमदी पेहरावांत वावरणारे अनेक वैदिक संस्कृतीचे लोक आहेत, त्याचप्रमाणे ख्रिस्तानेहि आपल्या धर्माचीं तत्वें 'तिबेटच्या आसपास हिंडत असतांना' बौद्धधर्मापासून घेतलीं, असेहि शोध त्यांनी दिले आहेत. एकंदरींत एकाच प्रकारचा मूर्खपणा अनेक ठिकाणीं सांपडतो असें जरी वरील शोधांवरून सिद्ध झालें, तरी त्यावरून त्यांत कांही 'त्रिकाला-बाधित' तत्वें सांठवलेलीं आहेत असें सिद्ध होत नाही. गीतेला पुनर्जन्म मान्य असला तरी त्याला काडीचाहि शास्त्रीय पुरावा नाही, आणि बाबावाक्याशिवाय कोणताहि आधार नाही. आमचा धर्म श्रेष्ठ, असें सगळेच म्हणतात. हिंदूंनी गीताधर्म श्रेष्ठ म्हटला, किंवा मुसलमानांनी आपला श्रेष्ठ म्हटला, तरी त्यांतून भांडणाशिवाय कांहीही निष्पन्न होत नाही. या भांडणांनी नुकसान मात्र होतें हेंहि ज्यांना कळत नाही, ते जगाच्या कल्याणाच्या गोष्टी बोलतात ! सर्व धर्मांचा नायनाट होईल तरच धार्मिक भांडणें थांबतील आणि कोणाचेंहि कांही नुकसान होणार नाही. पण हें धार्मिक लोकांना कसें कळणार ?

तुझी **शारदा**

---

# ग्रंथपरीक्षण

**१. रणांगण.** प्रकाशक, ह. वि. मोटे, मुंबई. पृष्ठें १२०, किंमत सव्वा रुपया.

लेखकाचें नांव प्रसिद्ध केलेलें नाही. नायक हाच लेखक कल्पून पुस्तक

लिहिलेलें आहे. त्याचें नांव चक्रधर विध्वंस. विलायतेंतून हिंदुस्थानांत परत येण्यास लागणाऱ्या दहा पंधरा दिवसांच्या अवधींत एकंदर सर्व गोष्ट घडते. भाषेंत पाल्हाळ बिलकुल नसून वाक्यरचना मोजूनमापून केलेली आहे.

गोष्ट पाहिली तर अगदी लहान आहे. नात्सी जुलमामुळे जर्मनी सोडून चीन देशांत जाणाऱ्या हर्टा नामक एका जर्मन ज्यू मुलीचें बोटीवर चक्रधर विध्वंस या महाराष्ट्रीय तरुणावर प्रेम बसतें. त्यांची मैत्री होते, परंतु प्रेमाची किंवा सलगीची ओढ तिलाच अधिक असते. चक्रधर मुंबईस उतरतो व त्याच रात्रीं हर्टा बोटीवर आत्महत्या करते. एवढेंच कथानक. परंतु तें लिहितांनां यूरोपांतील व बोटीवरील घडामोडींचें व चालीरीतींचें लेखकाने यथातथ्य वर्णन केलें आहे. जर्मनींतील ज्यू लोकांचा छळ, बोटीवरहि त्यांच्या दुःखावर दिल्या जाणाऱ्या डागण्या, ओळख नसतांहि तिऱ्हाइतांवर प्रश्नांचा भडीमार करण्याची त्यांची लोंचट संवय, इंग्रजी शिकण्याची घाई, इत्यादि अनेक गोष्टींचें मोठें हृदयंगम व हुबेहुब चित्र लेखकाने रेखाटलें आहे. बोटीवरील शिंदे नामक दुसऱ्या एका तरुणाला लुई नामक एका लहान मुलाचा लळा कसा लागतो व तो त्याचें हृदय कसें काबीज करतो, हें पाहूनहि ऊर भरून येतो. परंतु सर्वांत मला लेखकाचें कशाविषयी कौतुक वाटलें असेल तर तें शृंगाराविषयी लिहिण्याच्या त्याच्या हातोटीविषयीं. कोठेंहि अतिशयोक्ति न करतां इतक्या नाजूक विषयांतील खरींखुरीं चित्रें हुबेहुब रंगवण्यांत लेखकाने कमाल केली आहे. हें पुस्तक बरेंच खपेल यांत शंका नाही, तेव्हा दुसरी आवृत्ति काढतांना एक सुधारणा करण्याविषयी माझी लेखकाला, अथवा प्रकाशकाला, विनंति आहे. फ्रेंच अथवा जर्मन भाषा लेखकाला अवगत नाहीत. मात्र पुस्तकांत बऱ्याच ठिकाणीं त्या देशांचीं वर्णनें व तेथील भाषांतील शब्द आले आहेत. त्यांचे उच्चार अत्यंत चूक आहेत. उदा. monsieur या फ्रेंच शब्दाचा उच्चार 'मशूर' ( पृ. २० ) होत नाही. तसेंच deutsch या जर्मन शब्दाचा उच्चार 'डॉईश' ( पृ. २५ ) होत

नाही. तसेंच जर्मनमधें 'gute Nacht' म्हणतात, 'good nacht' नव्हे ( पृ. ३५ ). हे दोष किरकोळ व क्षम्य असले तरी त्यांमुळे रुचकर अन्न खातांखातां मधेंच खडा लागल्याप्रमाणे होतें.

माझा आणखी एक आक्षेप कथानकासंबंधी आहे. तो असा की हर्टा-बरोबर चुंबनादि चेष्टांपर्यंत मजल गांठली असतां, ती आपल्याला सर्वस्वी अनुकूल होईल हें माहीत असतां, व स्वतः पूर्णपणें अनुभवी असतांहि चक्रधर आपण होऊन समागमाची इच्छा दर्शवीत नाही इतकेंच नाही तर तिने ती दाखविली असतांहि तो जरा उदासीन राहतो, हें मला संभवनीय वाटत नाही.

शकुंतला परांजपे

# विवाहसौख्याला काय लागतें ?

या विषयावर प्रो. टरमन यांनी १९३८ सालीं एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ( सायकॉलॉजिकल फॅक्टर्स इन मॅरिटल हॅपिनेस ). तें लिहिण्यापूर्वी माहिती मिळवण्याकरतां म्हणून त्यांनी कॅलिफोर्नियामधील ११३३ विवाहित जोडपीं आणि १०९ सोडलग्न झालेलीं जोडपीं मिळून एकंदर २४८४ माणसांस प्रश्न विचारले. हे सर्व लोक शहरांत किंवा शहराच्या जवळ राहाणारे होते आणि शैक्षणिक दर्जाच्या दृष्टीने मध्यम किंवा त्याच्याही वरच्या दर्जाचे होते. अर्थात् वैवाहिक सुखासारख्या खाजगी गोष्टींसंबंधी माहिती मिळवतांना उत्तरें देणाऱ्या लोकांत विश्वास उत्पन्न झाला पाहिजे, आणि याकरतां उत्तरें पाठवणारांचीं नांवें कोणालाही कळूं नयेत अशा प्रकारची युक्ति योजली होती.

अमुक माणसांचा विवाह सुखी होईल की नाही हें विवाहापूर्वी कितपत सांगतां येईल, हें ठरवण्याकरतां ७९२ जोडप्यांनी दिलेली माहिती एकत्र केली. समान आवडीनिवडी, मतभेद झाल्यास निकाल करण्याची पद्धत, वैवाहिक

आयुष्याला पुनः सुरवात करणें झाल्यास निवड कशी कराल, विभक्त होण्यासंबंधी किंवा सोडलग्नासंबंधी कल्पना, स्वतःच्या सौख्याविषयी स्वतःचें मत, विवाह केल्याचा पश्चात्ताप, घरगुती तक्रारी, वगैरे अनेक प्रकारचे प्रश्न त्यांत होते. या सर्व बाबींचे परस्पर संबंध आणि महत्व पाहून त्या हिशेबाने प्रत्येक बाबीला एकएक गुणक ठरवून नंतर त्यांची बेरीज करून एकंदर सौख्याचा हिशोब केलेला होता.

यानंतर वैवाहिक सौख्याच्या दृष्टीने वैयक्तिक गुण, एकंदर परिस्थिति, आणि कामविषयक गुण, असे तीन विभाग करून त्यासंबंधी चारशें वेगवेगळीं कलमें करून माहिती मिळवली होती.

या सर्व माहितीचा एकंदर निष्कर्ष काढतां त्यांत कांही अनपेक्षित आणि आश्चर्यकारक गोष्टी सिद्ध झाल्या. केवळ घरीं बसून तात्विक दृष्टया ठरवलेल्या बऱ्याच गोष्टींचा सौख्याशीं संबंध नसतो. अशा गोष्टी म्हणजे कुटुंबाची मिळकत, धंदा, संतति असणें किंवा नसणें, धार्मिक शिक्षण, आणि नवराबायकोच्या वयांतील किंवा शिक्षणांतील भेद, यांना महत्व नाही. विवाहसमयींच्या कौमार्यालाही फारसें महत्व नाही. पण कांही क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींना मात्र फारच महत्व असतें असें ठरलें. उदाहरणार्थ मिळकत पुरेशी आहे की नाही, यापेक्षा पत्नीच्या पोषाखाच्या टापटिपीला किंवा गलिच्छपणाला अतिशय जास्त महत्व आहे.

दोन कामविषयक गोष्टींना अतिशय महत्व आहे असें आढळलें. एक म्हणजे स्त्रीची संभोगपूर्तिक्षमता आणि दोघांच्या कामवासनेंतील फरक. म्हणजे स्त्रीला कामपूर्तीला फार वेळ लागत असल्यास तें सुखाच्या आड येतें, आणि कामवासनेंत फार फरक असल्यास तेंही आड येतें. बुद्धीविषयी पाहतां पतिपत्नी जवळजवळ सारखीं असणें इष्ट आहे असें ठरलें. एकंदर स्त्रियांपैकीं जवळजवळ एक तृतीयांशांना संभोगकालीं समाधान होत नाही, किंवा क्वचित् होतें, असें आढळलें. ग्रंथकर्त्यांच्या मताने हा गुण कदाचित् आनुवंशिक असावा.

( अर्थात् या सर्व गोष्टी सरसकट सर्वच प्रकारच्या समाजांना लागू होतील असें धरून चालतां नये. तथापि यांतील बऱ्याच गोष्टी लागू पडतील यांत शंका नाही. विशेषतः कामवासनेसंबंधी ज्या गोष्टी महत्वाच्या ठरल्या त्या लक्षांत घेण्यासारख्या आहेत. विवाहसंस्थेचा हा सर्वांत मोठा दोष आहे की या महत्वाच्या गुणांविषयी विवाहापूर्वी खात्री करून घेणें शक्य नसतें, आणि तें जोंपर्यंत शक्य नाही, तोंपर्यंत विवाह म्हणजे एक सोडत आहे आणि तो सुखी होणें न होणें केवळ नशिबावर अवलंबून असतें. अशा परिस्थितींत या सोडतीचें तिकीट घेण्यांत इतर कोणत्याही सोडतीप्रमाणे फसण्याचाच संभव जास्त असतो. **सं.** )

---

**आमचा खटला.** डिसेंबर २१ ला निघायचा होता, तो न निघतां जानेवारी २४ ला नेमला आहे. या खटल्यांत आतांपर्यंत नऊ वेळां तारखा नेमण्यापलीकडे कांहीहि झालेलें नाही.

---

**सूचना.** या मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या सर्व गोष्टींतील पात्रें नेहमीच काल्पनिक असतात. तशींच या अंकांतहि आहेत. **संपादक.**

**विशेष सूचना.** हल्लीच्या स्थितींतच या मासिकाचा खर्च भागत नाही, कारण जाहिरातदारांच्या लहरींप्रमाणे आमचीं मतें बदलण्यास आम्ही तयार नसतों, आणि जाहिरातींचा उपयोग आमच्या मतांवर अवलंबत नाही हें कळण्याइतकी अक्कल जाहिरातदारांस नसते. अशा परिस्थितींत कागदाच्या वाढत्या भावामुळे आम्हास पुढील अंकापासून कदाचित् चार पानें कमी करावीं लागतील व भाड्याने किंवा फुकट वाचणाऱ्या वाचकांनी आपला कंजूषपणा चालू ठेवल्यास मासिक बंदहि करावें लागेल, कारण नोकरीचे अभावीं नुकसान सोसणें अशक्य आहे.

**संपादक.**

---

# समाजस्वास्थ्य

## मासिक मिळण्याचीं ठिकाणें :

**मुंबई**: सर्वत्र. **एजंटः** के. एन्. निमकर, २९५, चर्नीरोड, मुं.—४

**पुणें**: (१) एल्. के. जोशी बुकसेलर.

(२) प्रो. दि. धों. कर्वे, ६९–१ लॉ कॉलेज रोड, पुणें-४

( भेटण्याची वेळ, सकाळीं ७–३० ते ९–३० )

**सोलापूरः** समर्थ वाचनालय, नवी पेठ

**बार्शी :** के. एस. पिंपरकर

**कोल्हापूरः** स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**नागपूरः** बळवंत एजन्सी.

**बेळगांवः** जे, एम. माणूरकर ॲंड ब्रदर्स, खडे बाजार.

**पंढरपूरः** वि. वि. लिमये*

**मडगाव, गोवाः** दि. का. रेडकर

**नाशिकः** टकले आणि कंपनी.

**दक्षिण हैदराबादः** महाराष्ट्र न्यूज एजन्सी

**इंदूरः** पुरोहित ॲन्ड सन्स्.*

**अहमदनगरः** पी. जी. बापट. बुकसेलर, नवा कारंजा.

**रत्नागिरी :** शंकर कृष्ण भट.

**धरणगांवः** व्ही. के भावे.

**सांगली :** पाटकर ब्रदर्स

**हुबळी :** व्ही. डी. गोखले

**वाई :-** रा. ज. बनारसवाले

**कऱ्हाड :** जी. व्ही. फडके,* फोटोग्राफर

**बडोदा :** सरदेसाई आणि कं.

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**उमरावती :** जी. के. रानडे ॲंड् सन्स्

**संकेश्वर, गडहिंग्लज व हुकेरी रोड :** झनाना न्यूज एजन्सी

**खामगाव :** आपटे ब्रदर्स.

**ग्वाल्हेर :** डांके ब्रदर्स, लष्कर.

**बेलापूर रोड :** ना. अ. पेंडसे.

**भुसावळ :** पी. टी. पुराणिक.

**सावंतवाडीः** शिरोडकर ब्रदर्स.

* येथें आमचा इतर मालही मिळेल.

Registered No. B. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. **आधुनिक आहारशास्त्र**, किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.

२. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], दुसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.

३. **संततिनियमन** [ सचित्र ], ७ वी आवृत्ति,
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

४. **गुप्त रोगांपासून बचाव** [ सचित्र ], ३ री आ.
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

५. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [पहिलीं तीन वर्षें], २-४-०, ट.ख. ६ आ.
भाग २ रा [वर्षें ४ ५-६], २-० ०, ट. ख. ५ आ.
दोन्ही भाग घेणारांस किं. ४-०-०, ट. ख. ८ आ.

६. **त्वचेची निगा.** किं. ८ आ. ट. ख. ४ आ.

७. **गुरुबाजी** (नाटक ) किं. ८ आणे, ट. ख. ४ आणे.

### डॉ के. भा. लेलेकृत

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम**, २ री आ., किं. ५ आ.

२. **मूळव्याध.** किं. ४ आ.

व अनेक जादूचीं पुस्तकें, किंमत १ आणापासून २ रु.

### श्री. भास्कर धोंडो कर्वे, एम्. एड्. कृत,

**मी कसा झालों ?** किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

### प्रो. धों. के. कर्वे कृत

**संक्षिप्त आत्मवृत्त**, किं. १२; ट. ख. ५ आ.